# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, १९ डिसेंबर २०२३

⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १२७

⊙ आरएनआय : एमएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 19 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-127 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05


## येळकोट येळकोट जयमल्हार



चंपाषष्ठीनिमित्त कुलधर्म, कुलाचार संपूर्ण राज्यभरात घराघरात विधिपूर्वक संपन्न झाला. या षडरात्र उत्सवानिमित्त जेजुरी गडाला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. गडावर येळकोट येळकोट जयमल्हारचा एकच जयघोष झाला. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

### चर्चेतली बातमी

## एकाच दिवशी ७८ खासदारांचे निलंबन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राज्यसभा आणि लोकसभेतून सोमवारी एकूण ७८ खासदारांना निलंबित करण्यात आले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षांच्या ३३ खासदारांना निलंबित केलं. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी विरोधी पक्षांच्या ४५ खासदारांना निलंबित केले आहे. यापूर्वी लोकसभेतून १४ खासदारांना निलंबित करण्यात आलेले आहे. त्यामुळे निलंबित खासदारांची संख्या ९२ वर पोहोचली आहे. निलंबित खासदारांमध्ये काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी, राज्यसभा खासदार जयराम रमेश यांचाही समावेश आहे. यापैकी काही खासदारांना हिवाळी अधिवेशनाचा उर्वरित कालावधी पूर्ण होईपर्यंत निलंबित करण्यात आलं आहे. लोकसभेत केंद्रीय संसदीय कार्य मंत्री प्रल्हाद जोशी यांनी विरोधी पक्षांच्या खासदारांना निलंबित करण्याची मागणी केली. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

लोकसभेतून ३३ खासदारांचे निलंबन केल्यानंतर सभागृहाचे कामकाज ११ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले. ओम बिर्ला यांनी सभागृहात फलक आणू नये असे सांगितले होते. मात्र, संसदेच्या सुरक्षेचा भंग करुन युवकांनी केलेल्या घुसखोरीच्या मुद्यावरून विरोधक आक्रमक होते. यामुळे ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षांच्या खासदारांना निलंबित केले. यापैकी अब्दुल खालिक, विजय वसंत आणि के. जयकुमार यांच्या निलंबनाचा मुद्दा प्रिव्हिलेज कमिटीकडे पाठवण्यात आला आहे.

## 'वंचित'चा झंझावात, भाजपचा पराभव

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** अकोट तालुक्यातील चोहट्टा बाजार येथील रिक्त जि. प. सदस्य पदाच्या पोटनिवडणुकीत वंचितने भाजपचा १३९४ मताने पराभव केला. या विजयामुळे अकोला जिल्हा परिषदेतील सत्ताधारी वंचितचे संख्याबळ वाढले आहे. चोहट्टा बाजार येथील रिक्त जि. प. सदस्य पदाच्या पोटनिवडणुकीसाठी १७ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. या पोटनिवडणुकीत ५८.५२ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. अकोट येथे सोमवारी मतमोजणी करण्यात आली. एकूण वैध मतदान १०,००९ झाले. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार योगेश पंजाबराव वडाळ यांनी ३,७८१ मते घेत प्रतिस्पर्धी भाजपचे उमेदवार गजानन नाळे यांचा १३९४ मतांच्या अंतराने पराभव केला. गजानन नाळे यांना २,३८७ मते मिळाली. प्रहारचे जीवन खवले १७६५ मते घेऊन तिसऱ्या, शिवसेना ठाकरे गटाचे ११६० मतांसह चौथ्या, तर काँग्रेस पक्ष पाचव्या स्थानावर घसरला.

## उत्तरेकडून थंड वारे; राज्यात हुडहुडी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महाराष्ट्रासह देशभरातील तापमानात मोठी घसरण झाली आहे. खासकरून उत्तर भारतात कडाक्याची थंडी पडली आहे. पंजाब, हरियाना, चंडीगड आणि दिल्लीच्या काही भागांमध्ये तापमान 4 अंशांपर्यंत खाली आले आहे. त्यामुळे नागरिकांना शेकोटीचा आधार घ्यावा लागत आहे. सोमवारी पहाटेपासून राज्यातही तापमान कमालीचे घसरले असून दिवसभर हुडहुडी भरणारे वातावरण होते.**



कधी पाऊस, कधी धुके, कधी कडाक्याची उन्ह, तर कधी कडाक्याची थंडी अशा विचित्र हवामानामुळे यंदा द्राक्षावर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाला असून यामुळे अख्खा घडच करपत आहे . द्राक्षावर फळछाटणीनंतर पंधरा ते वीस दिवसांपर्यंतच करप्याचा हल्ला होऊ शकतो . यानंतर दावण्या व भुरीचा धोका उरतो . यंदा मात्र, द्राक्ष पक्वतेच्या स्थितीत पोहोचली असतानाही करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्याने तयार मालाची अवस्था बिकट झाली आहे .

उत्तर भारतात थंडी वाढल्याने महाराष्ट्रातील तापमानही घसरले आहे. नगर जिल्ह्यातील जेऊर येथे या वर्षातल्या सर्वात नीचांकी तापमानाची नोंद करण्यात आली आहे. या भागात 10.1 अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले आहे. येत्या काही दिवसांमध्ये हे तापमान आणखी कमी होण्याची शक्यता आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे तापमानात आणखी घट होणार आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी ढगाळ वातावरण पाहायला मिळत आहे. महाराष्ट्राच्या इतर भागांत देखील गारठा वाढला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी शेकोट्या पेटल्याचे चित्र दिसत आहे. जेऊरसह राज्याच्या इतर भागातही तापमान चांगलेच घसरले आहे. परभणीत 11 अंश सेल्सिअस, यवतमाळ येथे 11.5 अंश सेल्सिअस, तर निफाड येथे 11.6 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तसेच राज्याच्या इतर भागातही रात्रीच्या तापमानात घट झाली आहे. तसेच बहूतांशी भागात धुक्याची चादरही पाहायला मिळत आहे. तर जम्मू-काश्मीर, लडाखच्या काही भागात हिमवृष्टी होण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. दक्षिण आणि उत्तर भारतात पावसाची शक्यता असली तरी, महाराष्ट्रात हवामान कोरडे राहणार आहे. काही भागात ढगाळ वातावरण पाहायला मिळणार आहे. येत्या काही दिवसांमध्ये तापमानात आणखी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## भोकर भूमी अभिलेख कार्यालयाचा अनागोंदी कारभार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयात अनागोंदी कारभार झाला असून शेत जमिनी मोजून देण्यासाठी मोठा आर्थिक कारभार केल्या जातो तालुक्यातील थेरबन येथील शेतकऱ्यांची मालकी जमीन असताना मोजणीचे दस्तऐवज गहाळ करून जमीन मालकी दुसऱ्याच्या नावे लावल्याची तक्रार शेतकऱ्यांनी भूमी अभिलेख उप अधीक्षक कार्यालय यांच्याकडे केली आहे.

भोकर येथील भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयात गेली अनेक वर्षापासून नियमबाह्य कामे करून आर्थिक कमाई करण्याचे काम सर्रास चालू आहे, शेतकऱ्यांच्या जमिनी मोजणी करण्यासाठी जाणीवपूर्वक वेळ केला जातो, कामे वेळेवर होत नाहीत, शेतकऱ्यांची कामे करण्यासाठी आडवणूक केली जाते, या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या तक्रारी करून देखील संबंधित अधिकारी या कारभाराकडे दुर्लक्ष करतात, शेतकऱ्यांना मात्र कार्यालयात चकरा मारून हैराण व्हावे लागत आहे मालकी जमीन दुसऱ्याच्या नावे लावली.


भोकर तालुक्यातील थेरबन येथील शेतकऱ्यांनी लेखी तक्रार केली असून गट क्रमांक 143 क्षेत्र 12 हेक्टर ६४ आर पैकी तुकाराम महादू हुबेवाड, गंगाराम महादू हुबेवाड, बालाजी महादू हुबेवाड, लाला महादू हुबेवाड, दत्ता महादू हुबेवाड यांच्या नावे जमीन असून रेनापुर सुधा प्रकल्प साठी अतिरिक्त भूसंपादन होत असताना पाण्याला लागून शेतजमीन असताना जमिनी संपादित न करता भोकर भूमी अभिलेख उपाधीक्षक कार्यालयातील कर्मचारी भुसावळे व कलेटवाड यांनी संधी साधू लोकांशी हात मिळवणी करून आमच्या शेत जमिनीचे कागदपत्र गहाळ करून आमच्या मालकी व ताब्यातील क्षेत्र इतरांच्या नावे लावून आमचि जमीन संपादित होत नाही असे सांगितले.

**भूसंपादनाची नोटीस केली गहाळ :** भूसंपादनाबाबत आक्षेप घेण्यासाठी 25 जुलै 2023 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय यांच्याकडून निघालेली नोटीस आम्हाला मिळू दिली नाही पहिल्या मोजणीत आमची जमीन एक हेक्टर चार आर संपादित करण्यात आली होती मात्र ती का थांबवण्यात आली गट क्रमांक 143 144 145 चे फेर मोजणी करावी भोकर येथील भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयातील कर्मचाऱ्याकडून होणाऱ्या गैरकारभाराची चौकशी करण्यात यावी अन्यथा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे .










विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

माझ्या ओळखीतल्या एका गृहस्थांच्या मुलीचं लग्न ठरलं होतं. त्या लग्नाचं आमंत्रण आणि पत्रिका देण्यासाठी ते अगदी उभ्या उभ्या माझ्या घरी येऊन गेले. त्यांना म्हटलं, ' अहो, दोन मिनिट बसा तरी. ' ते म्हणाले, ' छे छे, बसायला वेळच नाही. या एवढ्या पत्रिका वाटायच्या आहेत. जवळच्या लोकांनाच फक्त देतो आहे. बाहेरगावच्या पाठवून झाल्या. आता काही ठिकाणी जायचं आहे. तेवढं ' उरकून ' घेतो. ' किती अंतर पडलं माणसामाणसांमध्ये ! जवळच्या नातेवाईक आणि मित्रमंडळींनाही जे आमंत्रण प्रेमाने द्यायचं असतं, ते असं ' उरकून ' घ्यावं लागतं. मग ज्यांना आमंत्रण दिलं आहे ती मंडळीही लग्नाला जाताना ' आता आमंत्रण आलंच आहे तर जावं लागेल. संबंध पडतात ना..' या भावनेने जाताना दिसतात. एकंदरीत सगळाच उपचार झाला आहे. याला कारण म्हणजे आपल्यात पडलेलं अंतर. आजकाल ' अंतर ' या शब्दाचा वापर मोठा मजेशीर होताना दिसतो आहे. लोक रांगेत उभे असतील तर एकमेकांमध्ये ' अंतर ' ठेवायला सांगितले जाते. मराठी शब्द ' सामाजिक अंतर ' हा आहे पण त्यापेक्षाही सोशल डिस्टन्स हा इंग्रजी शब्द आपल्या अधिक परिचयाचा झाला आहे. तसेही लोकांमध्ये, समाजात विविध कारणाने ' अंतर ' पडलेच होते. मध्यंतरी करोना आला आणि त्याने माणसामाणसात अजूनच अंतर पाडले. शारीरिक अंतर काही कारणाने भलेही असू द्या पण जेव्हा मनामनात अंतर पडतं, तेव्हा खरंच माणूस माणसापासून दूर जातो. ' अंतर ' या शब्दाला विविध अर्थ आणि छटा आहेत. असमानता, फरक, दूरता हे तर अर्थ आहेतच. पण रहस्य, मत, कसूर, तफावत, मन, हृदय इ अर्थ पण संदर्भानुसार होतात. ' भक्तीचे अंतर अतिगूढ...' यात रहस्य हा अर्थ घेता येतो. आपले अंतर ( मत ) कृपया स्पष्ट करावे. अंतर ( हृदय, मन ) उजळून निघावे. माझ्या सेवेत काही अंतर राहिले असेल तर कृपया क्षमा करावी. या वाक्यात ' अंतर ' या शब्दाचा ' कसूर ' असा होता. तू असं केल्याने असं कितीसं अंतर ( फरक ) पडणार आहे ? जेव्हा एखादी प्रिय व्यक्ती आपल्याला म्हणते, ' मला अंतर तर देणार नाहीस ना ? ' इथं अंतर देणे म्हणजे दूर लोटणे. असे अनेक आणि विविध अर्थ, छटा अंतर या शब्दाला आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर ' अंतर ' या शब्दाच्या अर्थात, छटांमध्ये बरेच अंतर आहे.



## आनंदी पहाट

# सेवाभावी असणे ही आध्यात्मिक संपत्ती

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

इतरांप्रती सेवाभावी असणे ही एक आध्यात्मिक संपत्ती आहे, जी समुदाय उभारणीत योगदान देऊ शकते. काही प्रकारच्या धर्मादाय पद्धतीशिवाय आपलेपणा आणि समुदायाची भावना निर्माण करणे अशक्य आहे, असे काही जणांचे मत आहे. देणाऱ्या आणि घेणाऱ्या दोघांनाही दानशूर असण्याचे भाग्य प्राप्त होत असते. दानशूर व्यक्ती ही केवळ गरजूंनाच मदत करत नाही, तर अशी व्यक्ती स्वतःमध्ये सकारात्मक चारित्र्य आणि वर्तन विकसित करत असते, हे समजून घेतले पाहिजे. धर्मादाय कार्य तुम्हाला इतरांच्या दृष्टीकोनातून जीवन पाहण्याची संधी देते. त्यांचे संघर्ष आणि त्रास, त्यांचे विजय आणि सामर्थ्य हे आपण स्वतः अनुभवत असल्याची प्रचीती येऊ शकते. दुसऱ्याच्या आयुष्याचे साक्षीदार होणे हा एक बहुमान आहे. त्यामुळे तुम्हाला तुमच्या स्वतःच्या जीवनाबद्दल प्रशंसा आणि कृतज्ञता प्राप्त होते. माणूस म्हणून, एक सामाजिक कुळ म्हणून, आपल्याला आश्वासक वातावरणात राहण्याची गरज आहे. जिथे आपले पालनपोषण केले जाते आणि एकत्र भरभराट होऊ शकते, जिथे संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी मजबूत बांधिलकी असते. एकमेकांप्रती दानशूर असणे ही केवळ एक चांगली गोष्ट आहे असे नाही, तर मानव म्हणून आपल्या जगण्यासाठी आणि स्थानिक तसेच जागतिक समुदाय म्हणून आपल्या कल्याणासाठी हे अत्यावश्यक आहे. एक व्यक्ती बेघर असलेल्यांना आश्रयस्थान देण्याची स्वयंसेवा करू शकते, आनंदाने जेवण देऊ शकते आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य आणू शकते. दुसरी व्यक्ती त्याच आश्रयाला पैसे देऊ शकते. आश्रयस्थानाच्या व्यक्तींना महिन्यातून एकदा साक्षरतेचा वर्ग शिकवून दुसरी तिचं ज्ञान आणि कौशल्य देऊ शकते. ही सर्व दानशूरता आणि सेवाभावी वर्तनाची उदाहरणे आहेत. आपण स्वतःला दुसऱ्याच्या जीवनात दयाळूपणे उपस्थित राहण्याचा अनुभव घेताना स्वतःमध्ये कृतज्ञतेचा अनुभव घेऊ शकतो.



आधुनिक केसरी

## ज्ञाने उपरती | खलनाश ||

कर्तव्याची पुजा | कर्माचे पुजन ||
आत्मा निरंजन | संतवृत्ती ||१||
चित्तात चिंतन | मौनात गुंजन ||
हरिचे भजन | रात्रंदिन ||२||
भक्तीचा उमाळा | भावाचे कोंदण ||
देवाशी भांडण | लडीवाळ ||३||
मायेचा गुलाम | विकारांचा दास ||
अहंकारी फास | खलवृत्ती ||४||
सत्कर्माची जाण | सज्जन संगती ||
ज्ञाने उपरती | खलनाश ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

बहुत देवांस नवस केले । बहुत गोसावी धुंडिले ।
गटगटां गिळिले । सगळे विंचू ॥४३॥
केले समंधास सायास । राहाणे घातलें बहुवस ।
केळें नारिकेळें ब्राह्मणास । अंब्रदानें दिधलीं ॥४४॥
केलीं नाना कवटाळें । पुत्रलोभें केलीं ढालें ।
तरी अदृष्ट फिरलें । पुत्र नाहीं ॥४५

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

विकसित कुमुद न चन्द्र बिन, नाहिं कमल बिनु भान ।
कल्प न विरवा जल बिना, तिमि विराग बिन ज्ञान ।।७६।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)
०६/०६/७६

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ज्याप्रमाणे चंद्राशिवाय कुमुदिनी , सूर्याशिवाय कमळ फुलत नाही आणि पाण्याशिवाय रोप जिवंत राहू शकत नाही त्याप्रमाणेच वैराग्याशिवाय ज्ञानाचा विकास होऊ शकत नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.


## श्री मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा।
गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥१॥
मना सज्जना भक्तिपंथेचि जावें।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें॥
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें।
जनीं वंद्य ते सर्व भावे करावे ॥२॥
प्रभाते मनी राम चिंतीत जावा।
पुढे वैखरी राम आधी वदावा॥
सदाचार हा थोर सांडूं नये तो।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥३॥
मना वासना दुष्ट कामा न ये रे।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे॥
मना सर्वथा नीति सोडूं नको हो।
मना अंतरीं सार वीचार राहो ॥४॥
मना पापसंकल्प सोडूनि द्यावा।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा॥
मना कल्पना ते नको वीषयांची।
विकारे घडे हो जनी सर्व ची ची ॥५॥
नको रे मना क्रोध हा खेदकारी।
नको रे मना काम नाना विकारी॥
नको रे मना सर्वदा अंगिकारू।
नको रे मना मत्सरु दंभ भारु ॥६॥
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे।
मना बोलणे नीच सोशीत जावें॥
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे।
मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥७॥
देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावे।
परी अंतरीं सज्जना नीववावे ॥८॥
नको रे मना द्रव्य ते पूढिलांचे।
अति स्वार्थबुद्धी नुरे पाप सांचे॥
घडे भोगणे पाप ते कर्म खोटे।
न होतां मनासारिखें दुःख मोठे ॥९॥

# संतांच्या संगतीचा परिणाम

आधुनिक केसरी



जडीबुटीवाल्याजवळ एक गोळी असते. ज्याच्या अंगात विष भिनले आहे अशा माणसाच्या जखमेवर ती गोळी नुसती ठेवतात. ती सर्व विष शोषून घेते. नंतर तिला धुतली की ती पूर्ववत् होते. त्याचप्रमाणे सत्पुरुषाच्या संगतीत आपले पाप शोषून घेतले जाते, आणि पुनः तो सत्पुरुष स्वतः शुद्धच राहतो. सत्संगती मिळेल, पण ती टिकणे फार कठीण काम आहे. साधारणपणे ज्या विषयाची आपल्याला आवड असते तसलीच संगत आपण बघतो. मीच वाईट म्हणून मी वाईट लोकांची संगत धरतो. विषयात दोष नाही; म्हणजेच, नुसते विषय बाधक होत नाहीत, विषयी लोकांची संगत मात्र फार बाधक असते. संगतीने आपल्यावर बरावाईट परिणाम होतो. विषय मागूनही जो ते देत नाही, त्यांपासून परावृत्त करतो, तो संत. विषयतृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे, हा संतसंगतीचा परिणाम. ज्याची संगत केली असताना भगवत्प्रेम प्रकट होते तो संत जाणावा. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. विषयाची गोडी फार; पण तो सुटावा असे वाटू लागले म्हणजे भजनपूजन करणाऱ्याची संगत धरावी. वाईट विचार मनात आले की नामाची जोड ठेवावी. आपला सर्वांठायी भगवद्भाव वाढू लागला म्हणजे संतांची प्रचीती येते. भगवंताच्या लीला पाहणाऱ्यांनाच खरा आनंद मिळतो. म्हणून संत नेहमी भगवंताविषयीच सांगत असतात. ते जे गातील तो संगीतातला रागच समजावा. तुकारामबुवा नुसते 'विठ्ठल विठ्ठल' म्हणत, पण त्याची गोडी आपल्या गाण्यामध्ये देखील नाही. खरोखर संतांना आपल्याविषयी इतकी कळकळ असते, आपल्याला ती कळतही नाही. संत आपल्या हिताचे सांगतात, पण आपले मन विषयात वावरत असल्याने त्यांचे बोलणे आपल्या मनात पूर्णपणे ठसत नाही. औषध कडू असले तरी रोग झाल्यावर आपण ते घेतोच ना ? मग प्रपंचातल्या व्याधींनी त्रस्त होऊनही आपण संतांच्या हितकारक बोलण्याकडे का दुर्लक्ष करावे ? ज्याला भगवंताचे अधिष्ठान आहे त्याचे कडक बोलणेसुद्धा कुणाला लागणार नाही. अत्यंत निर्भयता हा संतांचा पहिला गुण आहे, कारण 'सर्व ठिकाणी मीच आहे' ही भावना झाल्यावर भयाचे कारणच उरत नाही. आईपण जसे सगळीकडे सारखे, त्याचप्रमाणे सर्व संत एकच भाषा बोलतात. संतांनी मिळवलेले पद मिळविण्याचे साधन आपणही करतो; पण त्यांचे करणे निःसंशय असते, तर उलट आपण नेहमी शंकाच व्यक्त करीत असतो. डोळ्यांत खुपणारा खडा काढण्यासाठी त्यात लोणी घालतात; त्याने न खुपता खडा बाहेर पडतो आणि डोळा थंड होतो. त्याचप्रमाणे संतांची वाणी गोड, मऊ, हितकारक असते; तसे आपण बोलावे.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, १९ डिसेंबर २०२३

adhunikkesari.com | Adhunik Kesari


# तर जरांगेंना जशास तसे उत्तर देवू

## विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** मराठा समाजाचे आंदोलक मनोज जरांगे यांनी राज्यभर मराठा आरक्षणाला घेवून जो असंवैधानिक मागणीचा उन्माद मांडलेला आहे, त्यास पूर्व विदर्भातील चंद्रपूर जिल्हा क्रांतीभूमीतून उत्तर देण्याचे कार्य विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांच्या मार्गदर्शनातून ओबीसीतील सर्व जातसमुहांच्या प्रतिनिधींनी ओबीसी बचाव परिषदेतून (दि.१७) ला येथे केले आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लावाल तर महाराष्ट्र पेटवू, ओबीसींच्या संयमाची व शांततेची परीक्षा घेवू नका, ओबीसी खडा तो सरकारसे बडा हे लक्षात ठेवा, व जरांगेला जशास तसे उत्तर देवू, असे ओबीसी बचाव परिषदेने ठणकावून सांगितले आहे.
राज्यस्तरीय ओबीसी बचाव परीषद आज (दि.१७) ला स्थानिक जनता महाविद्यालयाच्या प्रांगणात महाराष्ट्रातील ओबीसीतील सर्व जातसमुहांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पडली. या परिषदेत ओबीसीतील सर्व जातसमुहांच्या प्रतिनिधींची वज्रमूठ बांधण्यात आली. जरांगे हे त्यांच्या सभांमधून बेताल वक्तव्य करीत आहेत. मराठा आरक्षणाबाबत त्यांची भूमिका वारंवार बदलत आहे. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मागत आहे. हे सर्व प्रकार असंवैधानिक आहेत. त्यामुळे ओबीसी बचाव परिषदेत मनोज जरांगे यांच्या बेताल, द्वेशपूर्ण व ओबीसी नेत्यांच्या तथा राज्य सरकारच्या विरोधातील वक्तव्याचा जाहीर निषेध करून ठराव घेण्यात आला. राज्य सरकारच्या ओबीसीबद्दलच्या काही निर्णयाचे व भूमिकेचे अभिनंदन करून ठराव घेण्यात आले तर राज्य व केंद्र सरकार संबंधित मागण्यांचे ठराव घेण्यात आले, सोबतच ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या पाठीशी ओबीसी समाज एकमताने उभा राहील, असेही ठरले.
सोबतच राज्य व केंद्र शासनाशी संबंधित मागण्यांचे ठराव देखील घेण्यात आले आहे. ज्यात, मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण द्या मात्र ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नका, मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देवून त्यांचे ओबीसीकरण करू नये, बिहारच्या धरतीवर ओबीसी जातनिहाय जनगणना सर्व्हे करावी व ओबीसींना २७% आरक्षण द्यावे, ओबीसी शेतकऱ्यांना वनहक्क पट्ट्यासाठी लागणारी तीन पिढ्यांची अट रद्द करा, महात्मा ज्योतिबा फुले यांचे समग्र वांग्मय दहा रुपये मध्ये उपलब्ध करून द्या, दिनांक २९ सप्टेंबर २०२३ रोजी राज्य सरकार सोबत पार पडलेल्या बैठकीतील इतिवृत्त मधील सर्व मागण्यांची पूर्तता होण्यासाठी सरकारने तात्काळ पाऊल उचलावे, महाराष्ट्र शासनाने ओबीसींचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी मेगा नोकर भरती त्वरित सुरू करावी, एससी, एसटी प्रमाणे शासकीय सर्व योजना ओबीसी शेतकऱ्यांना देखील १००% सवलतीवर राज्यात सुरू करा, खाजगी उद्योगधंद्यात व उपक्रमात ओबीसी समाजासाठी आरक्षण लागू करा, प्रत्येक तहसील व जिल्हास्तरावर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वस्तीगृहाची व्यवस्था करण्यात यावी, शेतमाल खरेदी करण्याकरिता उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव निश्चित करून एकाधिकार पद्धतीने खरेदी करण्यात यावी, शामराव पेचे आर्थिक विकास महामंडळाच्या घर्तीवर ओबीसीतील कमकुवत जातींसाठी विदर्भ मराठवाडा व इतर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, केंद्र सरकारने ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना करावी, दिनांक ४ मार्च २०१९ च्या सुप्रीम कोर्टाचे आदेशानुसार रद्द करण्यात आलेले ओबीसी राजकीय आरक्षण पूर्ववत सुरू करण्याकरिता संविधानाच्या कलम 243 डी (६) व कलम 243 सी (६) मध्ये सुधारणा करून देशातील ओबीसींना लोकसंख्येच्या प्रमाणात किंवा सत्तावीस टक्के राजकीय आरक्षण लागू करण्यात यावे, ओबीसी समाजाला लावण्यात आलेली क्रिमिलियरची अट त्वरित रद्द करण्यात यावी, तोपर्यंत नॉन क्रिमिलियर मर्यादा वीस लाख रुपये करण्यात यावी, महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोपरान्त भारतरत्न पुरस्कार जाहीर करण्यात यावा, केंद्रात व राज्यात एससी, एसटी प्रमाणे ओबीसी शेतकऱ्यांना शंभर टक्के सबसिडी योजना लागू करण्यात यावी, ओबीसी व सर्वच शेतकरी तथा शेतमजुरांना साठ वर्षे वयानंतर पेन्शन योजना लागू करण्यात यावी व शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, आदी मागण्यांचे ठराव घेण्यात आले. हे सर्व ठराव राज्य व केंद्र सरकारला पाठविण्याबाबत ठरले आहे.

# तर मी आत्महत्या करेन : बडगुजर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कुख्यात दाऊद इब्राहिमचा साथीदार सलीम कुत्ता याच्याबरोबर शिवसेना ठाकरे गटाचे नाशिक महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी केलेल्या पार्टीच्या चित्रफिती शिवसेना शिंदे गटाने उघड केल्यानंतर या पार्टीची एसआयटीमार्फत चौकशी करण्याचे नागपूर अधिवेशनात जाहीर करण्यात आले. तसंच, दुसरीकडे बडगुजर कंपनीत खोटे कागदपत्रे दाखल केल्यावरूनही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुधाकर बडगुजर चौकशी सुरू आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सुधाकर बडगुजर यांनी आता शिंदे गटाला आव्हान दिले आहे. सुधाकर बडगुजर म्हणाले, माझ्या दोन्ही बंगल्यावर एसीबीने छापा टाकला. त्यापूर्वी अॅन्टी करप्शनने गुन्हे दाखल केले. फॉर्जरी (खोटो कागदपत्र सादर केल्यामुळे) म्हणून गुन्हा दाखल केला. माझ्या ५३ वर्षांत माझ्या विरोधात साधी एनसीही नाही. त्यामुळे हा विषय माझ्या जिव्हारी लागला. बडगुजर कंपनीची मी स्थापना केली. २००६ साली निवडणूक मला लढवायची होती, त्यामुळे मी कंपनीतून निवृत्त झालो. सगळे सरकारी पुरावे माझ्याकडे आहेत. २०११ लाच कोर्ट पिटीशनमध्ये ऑर्डर आली. अॅन्टी करप्शनने जे मुद्दे मांडले आहेत, ते कोर्ट ऑर्डरमध्ये स्पष्टपणे आहेत. माझ्याविरोधात २०१४ ला तक्रार आली होती, मग माझं डीड तपासायला अॅन्टी करप्शनला दहा वर्षे का लागले? अन्याय करण्याच्या दृष्टीने कोणाच्या दबावाखाली पोलीस यंत्रणा काम करते? पोलिसांनी थोडं संयम ठेवला पाहिजे. पडताळणी केली पाहिजे. मागच्या प्रकरणातही म्युनिसिपल कामगार सेनेचं कार्यालय सील केलं. आम्ही या विरोधात हायकोर्टात गेलो. तिथे उच्च न्यायालयाने पोलिसांना माघार घेताय की कारवाई करू असा इशारा दिला. त्यावर पोलिसांनी माघार घेतली.

# पोलिस कर्मचारी देशमुख यांची बदली करा

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** येथील पोलिस ठाण्यात असलेले पोलिस कर्मचारीआर डी देशमुख यांची बदली करण्यात यावी अशी मागणी निवेदनादवारे पोलिस अधीक्षक मनिष कलवनिया यांच्याकडे करण्यात आली आहे. वडोद बाजार पोलीस ठाण्यात असलेले पोलिस कर्मचारी आर डी देशमुख वडोद बाजार बीटमध्ये सुरू असलेल्या अवैध व्यवसाय कडे. दुर्लक्ष करीत असून वडोद बाजार बीटमध्ये गिरजा नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू वाहतूक सुरू आहे. तर अवैध देशी दारूची विक्री केली जाते तर कल्याण मुंबई मटका जुगार सुरु आहे गावात असलेल्या अवैध व्यवसायाकडे लक्ष देत नसून यामुळे अवैध व्यवसाय वाढले आहे पोलिसाच्या दुर्लक्षामुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे मोठे रॅकेट तयार झाले असून पोलीस कर्मचारी आर डी देशमुख हे अवैध व्यवसाय करणाऱ्या कडे हेतू पुरस्कार दुर्लक्ष करतात त्यामुळे आर डी देशमुख यांची बदली करण्याची मागणी वडोद बाजार येथील ग्रामस्थांनी ग्रामसभेत ठराव मांडला होता या ठरावाची प्रत व ग्रामपंचायत सरपंच पकिज पठाण उपसरपंच गोपाळ वाघ ग्रामविकास अधिकारी रामदास पाथरे यांनी ठरावास मंजुरी देण्यात आली आहे. सुरू होत असल्याने गावात अवैध व्यवसाय होत असल्यामुळे वडोद बाजार येथील नागरिकांनी वडोद बाजार बीडचे कर्मचारी देशमुख यांच्याविरुद्ध बदलीचा ग्रामसभेत ठराव मांडला होता. ग्रामसभेत पहिल्यांदाच पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदलीबाबत ठराव मांडण्यात आला. या ठरावास सरपंच उपसरपंच पाकीजा पठाण उपसरपंच गोपाळ वाघ ग्रामविकास अधिकारी रामदास पाथरे, ग्रामस्थ रमेश वाघ मिर्झा बेग रत्नाकर शेख रईस पप्पू शेख ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले आहे.

# इंदिराबाई ललवाणी विद्यालयाची अमृतसर-आग्रा येथील शैक्षणिक सहल संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** जामनेरपुरा येथील इंदिराबाई ललवाणी विद्यालयाची शैक्षणिक सहल दि.११ ते १७ डिसेंबर दरम्यान अमृतसर-आग्रा या ठिकाणी यशस्वीरित्या संपन्न झाली यात इयत्ता ११ व १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील१२५ विद्यार्थिनींची व १० शिक्षक वृंद यांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला. आज रोजी आग्रा येथून हुबळी एक्स्प्रेसने सकाळी १०:१५ वा.भुसावळ येथे दाखल झाले. भारतातील अमृतसर येथील सुप्रसिद्ध सुवर्ण मंदिर, जालियनवाला बाग, अटारी वाघा बॉर्डर, आग्रा येथील ऐतिहासिक ताजमहल, आग्रा फोर्ट, भगवान श्रीकृष्ण जन्मभूमी मथुरा, केशरी घाट, ऐतिहासिक प्रेम मंदिर वृंदावन आदी.अश्या विविध प्रेक्षणीय स्थळांना भेट घेऊन ऐतिहासिक, भौगोलिक दृष्ट्या विद्यार्थ्यांनी अभ्यास घेतला. तसेच शेवटच्या सत्रात कांत पॅलेस हॉटेल, आग्रा येथे सांस्कृतिक कार्यक्रमाने सहलीचा समारोप करण्यात आला. सहलीला मुख्याध्यापक एस.आर.चव्हाण, उपप्राचार्य प्रा.के एन मराठे, पर्यवेक्षक प्रा.के डी निमगडे यांचे मार्गदर्शन लाभले तर सहल प्रमुख प्रा.विजय पाटील,ज्येष्ठ शिक्षक प्रा.जी जी अत्तरदे, प्रा.डी.झेड.गायकवाड, प्रा.आर.आर पाटील, प्रा.सविता महाजन, प्रा.माधुरी महाजन, प्रा.वैशाली पाटील, प्रा.राजश्री पाटील, प्रा.सचिन बावस्कर, क्रीडा शिक्षक प्रा.समीर घोडेस्वार यांनी सहलीसाठी परिश्रम घेतले. तथा बालाजी टूर्स अँड ट्रॅव्हल्स संचालक राजू सोनवणे, व्यवस्थापक सुबोध सपकाळे यांचे सहकार्य लाभले.






# काळजी घ्या!

आधुनिक केसरी

देशात पुन्हा एकदा करोनाचे रुग्ण वाढू लागले आहेत. करोनाचा सब व्हेरियंट JN.1 चा प्रसार वेगाने पसरू लागल्यानं करोनाचाही संसर्ग होऊ लागला आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, रविवारी ३३५ नव्या करोना रुग्णांची नोंद झाली आहे. धक्कादायक म्हणजे, रविवारी पाच करोनाबाधितांचा मृत्यूही झाला आहे. गेल्यावर्षीपासून करोनाच्या रुग्णासंख्येत घट होत असताना आता पुन्हा एकदा करोनाने डोकं वर काढलं आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचं आवाहन करण्यात येत आहे. पाच मृत्यूंपैकी चार मृत्यू एकट्या केरळमध्ये आहेत. तसंच, JN.1 हा सब व्हेरियंटसुद्धा केरळमध्येच आढळून आला आहे. त्यामुळे केरळ राज्यात सर्व उपाययोजना आखल्या जात आहेत. तर एक मृत्यू उत्तर प्रदेशमध्ये झाला असल्याची माहिती आरोग्य मंत्रालयाने दिली. दरम्यान, रविवारी ३३५ नव्या करोना रुग्णांची नोंद झाल्यानंतर एकूण रुग्णांची संख्या १७०१ झाली आहे. २०१९ पासून देशात करोनाचा संसर्ग पसरू लागला. तेव्हापासून देशात आतापर्यंत ४.५० कोटी लोकांना करोनाची लागण झाली. यापैकी, ४.४६ करोना बाधितांनी यशस्वी मात केली. तर, ५ लाख ३३ हजार ३१६ बाधितांचा मृत्यू झाला. याचाच अर्थ देशात करोनापासून बरे होण्याचं प्रमाण ९८.८१ टक्के असून मृत्यूचं प्रमाण १.१९ टक्के आहे, अशी माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली आहे. करोनाचे विषाणू सातत्याने स्वत:मध्ये बदल घडवून आणत आहेत. त्यामुळे नवनव्या विषाणूंची उत्पत्ती होत आहे. करोनाचा नवा विषाणू असलेल्या 'जेएन १'चे रुग्ण चीन आणि अमेरिकेमध्ये सापडत असून त्याचा पहिला रुग्ण भारतामधील केरळमध्ये सापडला आहे. भारतीय सार्स करोना जिनोमिक कर्न्सोटियम अंतर्गत सुरू असलेल्या करोना चाचणीदरम्यान ७९ वर्षीय महिलेला 'जेएन १'ची बाधा झाल्याचे आढळले. केरळमधील थिरूवअनंतपुरम येथील काराकुलम येथे ८ डिसेंबर रोजी एका वृद्ध महिलेला 'जेएन १'ची बाधा झाल्याचे निदर्शनास आले.या महिलेची १८ नोव्हेंबर रोजी करोनाविषयक (आरटीपीसीआर) चाचणी करण्यात आली. तिला सौम्य प्रकारची लक्षणे आढळली होती. तसेच तिला थोडासा अशक्तपणाही जाणवत होता. मात्र आता तिची प्रकृती उत्तम असल्याची मााहिती भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे महाव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजीव बहल यांनी दिली. केरळमध्ये आढळलेल्या 'कोविड-१९'च्या विषाणूचा 'जेएन.१' या उपप्रकार चिंताजनक नाही,' असे केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी रविवारी स्पष्ट केले.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# जहाल प्रबोधनकार - संत गाडगेबाबा

आधुनिक केसरी

**गाडगेबाबा म्हणजे एक जहाल, तिखट आणि अंधविश्वासामध्ये गुरफटलेल्या लोकांना झोंबणारे प्रबोधनकार होत. निरक्षर असलेल्या गाडगेबाबा यांनी शिकलेल्या लोकांना ज्ञानी करण्याचे काम हाती घेतले होते. गाडगेबाबा यांचे विचार, किर्तन आणि प्रबोधन म्हणजे अनिष्ट व्यवस्थेला चिरून माणसाला जागृत करून मानवतावादाची शिकवण देणारी चालती फिरती शाळाच होय. गाडगेबाबा यांचे विचार एवढे जहाल व परखड होते की आजही काही लोकांना त्यांचे विचार पटत नाहीत म्हणून महाराष्ट्राला ज्ञानी बनवणारे संत गाडगेबाबा अजून लोकांच्या घरात दिसत नाहीत. ज्यांच्या घरात गाडगेबाबा दिसत नाहीत त्यांच्या डोक्यात गाडगेबाबा दिसणे म्हणजे चमत्कारच म्हणावा लागेल.**

आजही अशी धारणा आहे की अंधश्रद्धा, देवदेवता, अनिष्ट रुढीपरंपरा, कर्मकांड यावर बोलणारा हा धर्म विरोधी आहे. परंतु सत्तर वर्षा अगोदर गाडगेबाबा यांनी या विषयाला हात घालुन महाराष्ट्रामध्ये संताची परंपरा कायम ठेवली. गाडगेबाबा समाजातील ज्वलंत विषय हाती घेऊन प्रबोधन करत असत. विचाराने लोकांच्या डोक्यातील घाण साफ करण्याचे काम गाडगेबाबा यांनी केले. समाजातील ज्वलंत विषय व्यसन, सावकारी, अंधश्रद्धा, कर्मकांड, स्पृश्य अस्पृश्यता, भोदुगिरी यावर सडकून प्रहार करणारे आणि व्यवस्थेला थेट, सत्य प्रश्न विचारणारे गाडगेबाबा हे खऱ्या अर्थाने समाजाचे प्रबोधनकार होत. प्रश्न आणग समस्या ह्या माणसाला असताना आणि त्यातून सुटका होऊन माणसाचे जिवन सुखद कसे होईल यावर औषध म्हणजे गाडगेबाबा यांचे किर्तन होय. गाडगेबाबा यांचा जन्म एका गरीब घरात झाल्याने कर्जबाजारीपणा चे चटके आणि सावरकराचे शोषणाचे विचार जवळून पाहिले. म्हणून कोणत्याही माणसाने सावकारा कडून कर्ज घेऊन आपली शेत जमीन किंवा इतर काही मौल्यवान वस्तू गहानात ठेऊ नये म्हणून गाडगेबाबा लोकांना प्रबोधनाच्या माध्यमातून सांगत. आम्ही जर गाडगेबाबा यांचे विचार थोडे जरी स्विकारले असते त्यावर विचार केला असता तर आम्हाला कर्जबाजारीपणा समजला असता. गाडगेबाबा यांनी कर्जबाजारी होऊ नका असा मौलिक संदेश दिला तरी आज भारत एवढा कर्जात बुडाला आहे की पन्नास वर्षे त्यातून बाहेर येईल की नाही याची शाश्वती नाही. शेतकरी महिला आजही कर्जात आहेत. कर्ज मानसाला कधीच प्रगती करू देत नाही म्हणून खर्चावर मर्यादा घालून नियोजन करण्याची शिकवण गाडगेबाबा यांची होती. दुसरी समस्या म्हणजे व्यसन. दारु ही तशी खुप काळापासून समस्या बनली आहे. आजही आपण विचार केला तर दारू ही सर्वात मोठी समस्या आहे. घरात दुध न पिणारे बाहेर महागडी दारू पिऊन आर्थिक दारिद्रय स्वतः निर्माण करतात. घरामध्ये खायला, मुलांना शाळेत जायला, पुस्तक घ्यायला कपडे घ्यायला पैसे नसताना परंतु प्यायला बरोबर पैशाचे नियोजन होते याचा दुष्परिणाम घरावर शिक्षणावर, आरोग्यावर आणि अर्थाजनावर होतो याची जाणीव लोकांना राहली नाही. भारतीय समाजाला लागलेला सर्वात भंयकर व्यसन कोणते असेल तर ते आहे अंधश्रद्धा. आजही आपण बघतो सुशिक्षित लोक सुद्धां अंधश्रद्धा, कर्मकांड, भोदुगिरी यांच्या आहारी गेलेले आहेत. आणि अंधश्रद्धा, कर्मकांड आणि भोदुगिरी वर जर कोणी बोलत असेल तर ते त्यांना धर्माचे विरोधक, नास्तिक समजतात. आणि गाडगेबाबा हे अंधश्रद्धा, कर्मकांड आणि भोदुगिरी यावर थेटवार करून समाजालाच प्रश्न विचारून पटवून देत असत. परंतु हेच विचार आजच्या पैशाच्या थैल्या घेऊन, अंधश्रद्धा जोपासऱ्या लोकांना पटत नाहीत म्हणून एकही स्वंय घोषित किर्तनकार कीर्तनात गाडगेबाबा यांचे नाव घेत नसेल. अंधश्रद्धा आणि देवदेवता याबद्दल तर गाडगेबाबा खुप आक्रमक होते. कारण लोक शिक्षण, आरोग्य यावर खर्च न करता अंधश्रद्धेपोटी आपला पैसा इतरत्र खर्च करत म्हणून आर्थिक आणि शैक्षणिक दारिद्रय वाढतच आहे असे गाडगेबाबा बाबा यांचे मत होतै म्हणून तर त्यांनी यावर कठोर प्रहार केले. देव कोणाला दिसला नाही, दिसणार पण नाही मग न दिसणाऱ्या देवासाठी एवढा खटाटोप कशाला असा थेट प्रश्नच ते लोकांना विचारत होते. देतो तो देव. तो जर सर्वांना देतच असेल तर तुमच्या कडून काही घेण्याची अपेक्षा तो कशाला करेल. तुमच्या कडून दान स्वरुपात घेऊन तुम्हाला दारिद्रय बनवणारा देव कसा होऊ शकतो म्हणून होम हवण कर्मकांड करून आपला पैसा वाया घालु नका. अशी शिकवण त्यांची होती. सत्यनारायण घालून एखादी गोष्ट चांगली होते हे केवळ आणि केवळ काल्पनिक आणि यावर विश्वास ठेऊ नका असे प्रबोधन गाडगेबाबा हे नाट्यमय पद्धतीने करत म्हणजे लोकांना सुद्धां समजायला सोपे जाई आणि लोकांना ते पटत असे. संत किंवा सत्पुरुष कोणाला म्हणायचे तर ज्यांच्या अंगी दया आहे तो सत्पुरुष असे गाडगेबाबा किर्तनाच्या माध्यमातून सांगत होते. देव हा दगडात नसुन रंजल्या गांजल्याच्या सेवेमध्ये आहे. दगडामध्ये फक्त अंधश्रद्धा आहे असे रोखठोक किर्तन गाडगेबाबा करत. देव दगडामध्ये तर माणसामध्ये आहे हे गाडगेबाबा नेहमी सांगत असत.

**देव देव करता शिनले माझे मन**
**पाणी आणि पाषाण जेथे तेथे**
**हेच ते संत कबिराच्या भाषेत सांगायचे**
**जतरा मे बिठाया पथरा तिरथ बनाया**
**पाणी पैसो की धुलधानी**

### दुनिया हुई दिवानी

अक्षर ओळख नसलेल्या गाडगेबाबा यांना हे माहिती होते पण आमच्या स्वतः सुशिक्षित समजणाऱ्या लोकांना आजही माहिती नाही याची खंत वाटते. देव दगडात शोधल्या पैसा जो माणसाची सेवा करतो त्यांना देव माना असा आग्रह गाडगेबाबा करत देव कोण तर बाबासाहेब आंबेडकर यांनी शाळा काढून गोरगरीब लेकरांना शिकवले त्यांना देव माना. संत तुकाराम महाराज यांच्या ओवीचे उदाहरण देऊन ते स्पष्ट करतात.

**तुका म्हणे एकचि मरण खरे**
**उत्तमची उरे किर्ती मागे**

ज्याची किर्ती मागे उरते त्याला देव माणन्याचा संदेश गाडगेबाबा यांचा होता.

अस्पृश्यता आणि जातीवाद खुप मोठ्या प्रमाणात होता जातीवाद आणि अस्पृश्यता निवारण करण्यासाठी गाडगेबाबा नाट्यमय पद्धतीने लोकांना समजून सांगत असत आणि लोकांनाच प्रश्न करत असत आपण एकाच देवाची लेकरं तर वेगवेगळे कसे? असा सवाल करून एकीची भावना लोकांच्या डोक्यात भरत होते. तांब्या ला एखाद्या अस्पृश्य माणसाचा हात लागला तर काय होते? लोकांचे उत्तर - बाटतो. गाडगेबाबा यांचा पुन्हा प्रश्न- मग त्याला काय करतात? लोकांचे उत्तर शुद्ध, गाडगेबाबा यांचा पुढचा प्रश्न शुद्ध कसे करतात? लोक - तांब्याला विस्तवावर तापवून. गाडगेबाबा मग माणसाला हात लागला तर काय होते? लोकांचे उत्तर बाटतो. गाडगेबाबा यांचा पुढचा प्रश्न मग माणूस बाटला तर काडी कचरा गोळा करा आणि द्या पेटून. यातून आपण माणव सर्व एकच आहोत हा निर्मळ संदेश गाडगेबाबा देत. गाडगेबाबा जेथे किर्तन करत तेथे जेवनही करत नव्हते. आणि फुकाचे कधी खात नव्हते. एवढे जरी आज लोकांना कळाले तरी भरपूर लोक ज्ञानी झाले असे समजून जाईल. याच बरोबर गाडगेबाबा यांचा जोर हा शिक्षणावर होता. आपल्या मुलांना शिकवा आणि मोठे करा. शिकलेले मुल दिल्लीत जाऊन भाषण देतात आणि न शिकलेले मुल ओझ उचलतात अशा प्रकारचे दाखले देऊन शिक्षणाचे महत्व पटवून द्यायचे. शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना त्यांच्या समोर एकमेव उदाहरण होते ते म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे. बाबासाहेब शिकले तर दिल्लीत भाषण करतात, गरीबाच्या मुलांना शिकवतात, आपणही मुलांना शिकवून मोठे केले पाहिजे हा आग्रह त्यांचा असे. संत गाडगेबाबा हे पंढरपूर येथे नित्य नियमाने जायचे तेथे जाऊन लोकांची सेवा करायचे. दुरवरुन आलेल्या लोकांना राहण्याणी सोय होत नसे तसेच अस्पृश्यता पाळली जात असल्याने बऱ्याच लोकांना निवारा उपलब्ध होत नसे. अशा परिस्थितीत लोक निधी मधून गाडगेबाबा यांनी पंढरपूर येथे अस्पृश्यांसाठी धर्मशाळा बांधुन निवारा आणि अन्नचा प्रश्न सोडवला. समोर पुन्हा मराठा धर्म शाळा व परिठ धर्मशाळा सुरु करुन धर्माच्या नावावार पोट भरणाऱ्या लोकांना चपराक दिली. लोकांनी दिलेल्या पैशाचा गैरवापर होणार नाही म्हणून त्यांनी कसोटीवर तपासून माणसाची नियुक्ती केली आणि धर्म शाळा सुरू करून वारकरी लोकांना मोठा हातभार लावला. स्वतः ला साधु संत समजणारे लोक हे आपल्या शिष्यांचा वापर वैयक्तिक कामासाठी करून घेत. मठामध्ये दारुचे सेवन करत. दारूमुळे लोकांचे जिवन उद्ध्वस्त होते आणि येथे स्वतः ला साधु समथणाराच दारू पितो हि गोष्ट गाडगेबाबा यांच्या मनाला चटका लाऊन गेली म्हणून गाडगेबाबा यांनी कोणाला गुरू केले नाही आणि त्यांना कोणी शिष्य सुद्धां जोडून घेतला नाही. सदैव लोकांना भुलथापा, अंधश्रद्धा, कर्मकांड, भोदुगिरी, व्यसन यामधून बाहेर काढण्यासाठी संत गाडगेबाबा यांनी किर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन केले. आज काही लोक किर्तनाच्या नावाखाली धंदा करतात हजारो रुपये लोकांकडून घेऊन अंधश्रद्धा, भोदुगिरी, कर्मकांडाचे महत्त्व सांगतात, सेवेच्या नावाखाली घेतलेला पैसा वैयक्तिक जिवनावर खर्च करतात. विज्ञानवाद, तर्क, अंधश्रद्धा, कर्मकांड, भोदुगिरी यावर कोणी बोलले तर आजचे किर्तनकार त्यांना धर्मविरोधी समजून त्यांना शिव्या देतात, धमक्या देतात, अनैतिक शब्दाचा वापर करतात. म्हणून कधी कधी प्रश्न येतो गाडगेबाबा तुम्ही सत्य बोलत होता अंधश्रद्धा, भोदुगिरी, कर्मकांड, नाकारून मानवहिताचे प्रबोधन करत होता म्हणून आज आम्हाला विज्ञानवाद आणि वारकऱ्यांच्या किर्तनाचे महत्व पटले. आज गाडगेबाबा यांचा स्मृतीदिन, यादिवशी किमान पाच लोकांनी तरी अंधश्रद्धा, भोदुगिरी, विषमता, व्देष सोडून दिला तर गाडगेबाबा यांना खरी आदरांजली ठरेल. गाडगेबाबा यांचे कार्य बहुआयामी होते, ते एका लेखामध्ये, पुस्तकामध्ये बंदिस्त करणे शक्य नाही. तरी हा छोटासा प्रयत्न.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# मानवी कुळाचे कुलदैवत जेजुरीचे मल्हारी मार्तंड खंडोबा

आधुनिक केसरी

**प्रत्येक धर्माच एक तत्त्वज्ञान असतं त्या त्या नुसार नैसर्गिक शक्ति ज्याला आपण ईश्वर स्वरूप समजतो ती कल्पना संकल्पना निर्धारित होत असते.याला सृष्टी वरील कोणाताही धर्म अपवाद नाही. आपल्या धार्मिक तत्वज्ञाना नुसार कालयुगात ऋषी मुनी यांच्या सह सर्व सामान्य लोकांना आपल्या अमानवीय कृत्याने प्रचंड त्रास देणारे दैत्य मणी मल्ह यांनी जेव्हा प्रंचड मोठ्या प्रमाणात उच्छाद मांडला ऋषी मुनी यांच्या धार्मिक कार्यात विघ्न निर्माण केल. मानवता आणि मानवी कुळ जवळपास संपुष्टात येईल अशी स्थिति निर्माण केली. तेव्हा मानवी कुळाचे रक्षण व्हावं म्हणून ऋषी मुनी यांच्या विनंतीला मान देऊन सृष्टी चे संहारक श्री भगवान शिव शंकर यांनी मल्हार मार्तंड अवतार धारण करून सृष्टी वर विध्वंस करणारे दैत्य मनी मल्ह यांचा संहार करून मानवी कुळाचे रक्षण केल.**

आणि त्याच वेळी सर्वांच्या विनंतीला मान देऊन मानव कल्याण व्हावं म्हणून मल्हारी मार्तंड या रूपाने सृष्टीवर मानवी कुळाच कुलदैवत म्हणून निवास करण्याचं मान्य केल.तेव्हा पासुन प्रत्येक घरात खंडोबा मल्हारी मार्तंड हे दैवत पुजा अर्चा होऊ लागली आणि चंपाषष्ठी हाच दिन ज्या दिवशी या दुष्ट रक्षसांचा वध करून मार्तंड मलहरी जेजुरी निवाशी स्थानापन्न झाले.ब्रह्मा विष्णू महेश हे सृष्टीचे निर्मिते असून सृष्टी वर घडणाऱ्या घटना घडामोडी नियंत्रित करण्यासाठी अनेक वेळा अनेक देव देवी देवता यांनी अवतार धारण केला हे वास्तव आहे खरं आहे खोट आहे काल्पनिक आहे हा ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत श्रद्धेचा त्याच बरोबर ज्ञान विज्ञान आणि तत्वज्ञान या विषयी असणार्या अभ्याचा भाग असुन या पैकी बहुतांश बाबी ह्या पौराणिक धर्म ग्रंथां मध्ये नमूद आहेत.आपल्या संस्कृती नुसार व धर्म शास्त्रनव्ये सृष्टीच्या निर्मित मध्ये पालन पोषण आणि संहार करण्यात अनेक देव दैवतांची वेगवेगळी वेळेनुरूप भुमिका आहे. वेगवेगळ्या युगात लोककल्याणासाठी देव दैवतांना मानवी अवतार धारण करावा लागला .असं आपल्या धर्मातील तत्व ज्ञाना संगत.याच प्रमाणे मार्गशीर्ष महिन्यात चंपाषष्ठी निमित्ताने आपण मल्हारी मार्तंड खंडोबा यांची जी मनोभावे पुजा करतो त्यांच महत्व हे खुप वेगळं आहे कारण खंडोबा हे मानवी कुळाचे कुलदैवत आहे.कालयुगातील सकल मानवी समुहाच रक्षणकर्ते कुलदैवत हे मल्हारी मार्तंड खंडोबा आहे.सृष्टी वर कलयुगाच्या प्रारंभी मणि व मल्ल या दैत्यांनी हहाकार मांडला होता.ऋषी मुनी यांच्या यज्ञात विघ्न निर्माण करून कौटुंबिक सदस्यांना त्रास दिल्यानंतर हि सगळी मंडळी व्यथित होऊन प्रथम इंद्रा कडे आपलं मत व्यक्त करण्यासाठी गेले इंद्र यांनी भगवान विष्णू यांच्या कडे जाण्याचा सल्ला दिला त्या नुसार हि सर्व मंडळी श्री भगवान विष्णू यांच्या कडे आली. श्री भगवान विष्णू यांच्या सल्ल्यानुसार हि सर्व मंडळी भगावन विष्णू यांच्या समावेत कैलासावर भगवान शिव यांच्या कडे मोठ्या अपेक्षेने पोहचले. श्री भगवान शिव शंकर यांच्या अज्ञेनंतर ऋषी मुनी यांनी आपल्या वेदना व्यथा व्यक्त केल्या .ऋषी मुनी यांच्या वेदना ऐकल्यावर भगवान शिव प्रचंड संतापले आणि सृष्टी चे रक्षणकर्ते शिव यांनी दुष्ट राक्षस असुर मणि मल्ल यांचा समुळ नाश करण्याचा प्राण केला.युद्धाला प्रारंभ झाला याच दरम्यान सृष्टी वर खुप भयानक संग्राम होऊन मणि मल्ल यांचा अंत खडगधारी भगवान शिव यांनी केला.युद्ध समाप्ती नंतर ऋषी मुनी यांनी भगवान शिव शंकर यांचे आभार व्यक्त केले .व सृष्टी च्या कल्याणासाठी सकल ऋषी मुनी यांनी भगवान शिव यांच्या कडे एक विनंती केली . सदरील विनंतीला मान देवून सृष्टी वरील सकल मानवी समुहाच रक्षण आणि कल्याण करण्यासाठी खंडोबा या नावाने सह्याद्री च्या कठेपाठारावरील जेजुरी गड या ठिकाणी कायम निवास करण्याचं मान्य केले.आणि त्या अनुषंगाने मार्गशीर्ष महिन्यातील षष्ठीला भगवान शंकर यांनी खंडोबा अवतार धारण केला.अंनत नाव धारण करणारे अखंड मानव समुहाचे कुलदैवत खंडोबा यांचा महिमा अगाध आहे.गावोगावी खेड्या पाड्यात तसेच नागरी भागात सुद्धा प्रत्येक कुटुंबात खंडोबाची पुजा आणि महत्व आहे .दर वर्षी मार्गशीर्ष महिन्यात चंपाषष्ठी दिवसी , जेजुरी सह राज्यातील अनेक गावांत भव्य दिव्य अशा स्वरूपात यात्रा उत्सव साजरा होतो .तळी उचलून भंडारा उधळणे,आणि यळकोट, यळकोट जय मल्हार नामाचा निनाद घरा घरात होतो . राज्यातील जेजुरी, नळदुर्ग,पाली मुंबईत मलबार हिल परिसरात अगदी राजभवन गेट समोर तसेच कर्नाटक राज्यात सुद्धा म्हाळसकांत खंडोबा यांची प्रसिद्ध मंदिर आहेत.अंखड मानव कुळाचे दैवत मलहरी मार्तंड जेजुरी निवासी खंडोबा यांची भक्ति आजही भाविक तितक्याच सात्विकतेने मनोभावे करतात.जेजुरीतील हा यात्रा उत्सव राज्यात आकर्षणाचा क्षण असतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ओबीसी आरक्षणाची तळमळ भाजपालाच आहे

## संजय गाते यांचे प्रतिपादन : भोकरला विश्वकर्मा योजना नोंदणी शिबिरास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** काँग्रेस पक्षानीच ओबीसी बांधवांना आरक्षण मिळु दिल नाही.सन१९५० ला ३४० व्या कलमानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षण मिळवून दिल. काग्रेसच्या तत्कालीन नेत्यांनी विरोध केला.काकासाहेब कार्लेकराचा अहवाल मान्य केला नाही.ओबीसी आरक्षणाची खरी तळमळ भाजपालाच आहे.असे प्रतिपादन भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रांत अध्यक्ष संजय गाते यांनी रविवारी (ता. १७) केले आहे.
#शहरातील माऊली मंगल कार्यालयात भारतीय जनता पक्ष जिल्हा ओबीसी मार्चच्या वतीने पंतप्रधान विश्वकर्मा योजना नोंदणी शिबिर व मार्गदर्शन आयोजित करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. खासदार प्रताप पाटील चिखलीकर अध्यक्षस्थानी होते.व्यासपिठावर भाजपा मोर्च्याचे प्रदेश सरचिटणीस शरद पाटील,उपाध्यक्ष डॉ. मोहन चव्हाण, किशोर देशमुख,निळू पाटील,बाळा साकळकर,तूकाराम चव्हाण, संजय कौडगे, रामदास पाटील सुमठाणकर, बाबुराव केंद्रे,हरीदत्त हाके,राजेश करपे,साई राठोड,प्रकाश कोंडलवार, हरिभाऊ चटलावार,दिवाकर रेड्डी, श्रीकांत किन्हाळकर,एड.वारकड,सराजश्रीताई यांची उपस्थिती होती.श्री.गाते म्हणाले की,व्ही.पी.सिंगानी मंडळ आयोग लागू करून ओबीसींना आरक्षण दिल,आजकाहि मंडळी ओबीसीचा पूळकि दाखवत आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी मंत्रालय स्थापण करून महाज्योती अंतर्गत प्रशिक्षण देऊन ओबीसींना अधिकारी होण्याची संधी दिली. बाराबलूतेदारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १३कोटि रूपयांची तरतूद करून व्यवसायास उभारी मिळवून दिली असे सांगितले आहे.प्रास्ताविक भाजपा ओबीसी मार्च्याचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष गणपत पीठ्ठेवाड यांनी केले.बालाजी वाघमारे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले आहे.शिबीरास बहूसंख्य नागरिकांची उपस्थिती होती.

# आमदारकीचा चौकार मारतील आ. मकरंद पाटील; जनतेचा विश्वास हाच विजयाचा बॅनर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**



**लोणंद :** गेली तीन टर्म 'वाई-खंडाळा-महाबळेश्वर' या विधानसभा मतदारसंघात "विजयी भव" हा जनतेचा कौल प्रत्येक वेळी आमदार मकरंद (आबा) पाटील यांच्याच बाजूने मिळत आलेला आहे. निवडणुकीच्या वेळी आबांच्या विरोधात विरोधकांकडून मोठे रान पेटविले जाते. तरीसुद्धा हे पेटलेले रान "जनतेच्या कौल" ने मात्र विझुन जाते.कुणी कितीही आबांच्या विरोधात आग ओकण्याचा प्रयत्न केला तरी आबाच किंग मेकर बनत असतात.ही किंग मेकर बनण्याची संधी त्यांच्यावर विश्वास ठेवणारी हीच जनता त्यांना मिळवून देत असते.मतदारसंघात विकासकामे झाली नाहीत.म्हणून आमदार मकरंद (आबा) पाटील यांच्या विरोधात विरोधकांकडून कायम बोंब मारली जात असते.परंतु आमदार मकरंद (आबा) पाटील आपल्या साठी काय करत असतात.याची जाणीव जनतेला,कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना असल्याने ही जनताच त्यांच्यावर विश्वास टाकत असते.मतदारसंघातील गावो गावच्या सोसायटीच्या निवडणूका असो,
ग्रामपंचायत निवडणूक असो,कारखान्याची निवडणूक असो,कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक असो किंवा अन्य कोणतीही निवडणूक असो अशा प्रत्येक ठिकाणी आ.मकरंद (आबा) पाटील यांचाच जलवा पाहायला मिळतो. जनतेचा विश्वास हा आबांच्या नेतृत्वावरच दिसुन येतो. आबांच्या नावाची चर्चा झाल्याशिवाय विरोधकांना सुद्धा राजकारण केल्या सारखं वाटत नाही.कारण टीका टिपण्या तर कराव्याच लागतात.त्याचप्रमाणे विरोधकांकडुन सुध्दा शब्दांना धारच लावलेली पाहायला मिळत असते. खरंतर मकरंद (आबा) पाटील हे प्रत्येक गावात जाऊन पोहचलेले आहेत.त्यामुळे आबांच्या विरोधकांची किती ही एकजूट झाली, किती ही बोंबा बोंब केली तरी त्याचा परिणाम आबांवर व त्यांच्या राजकारणावर होत नाही.आबांना विजयी होण्यापासून कुणीच रोखू शकत नाही.इतका विश्वास हा त्यांनी जनते मध्येच निर्माण केलेला आहे.गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत आबांच्या विरोधात विरोधकांनी मोठी एकजूट केली होती. ही एकजूट करून सुद्धा आ.मकरंद (आबा) पाटील यांना आमदारकीची हॅट्रिक मिळविण्यापासून विरोधक रोखू शकलेले नाहीत.यंदाच्या पंचवार्षिक निवडणुकीतून मकरंद आबा आमदारकीचा चौकार मारतील असा विश्वास सुध्दा त्यांच्या कार्यकर्त्यांना,पदाधिकाऱ्यांनाच नव्हे तर जनतेला सुद्धा वाटत आहे.मतदारसंघात चांगली फलंदाजी कशी करायची? विरोधकांच्या भेदक माऱ्यापुढे कशी लढत द्यायची? हे सर्व जनताच विरोधकांना दाखवून देत असते.त्यामुळे आबांच्या कर्तृत्वाचा दबदबा हा जनतेच्या विश्वासातूनच पाहायला मिळतो.सद्यस्थितीत राष्ट्रवादी फुटलेल्या स्वरूपात आहे.दोन गट तयार झालेले आहेत.त्यामुळे अनेक इच्छूकांना सुद्धा आताच आमदार झाल्यासारखे वाटू लागलेले आहे.
आबांच्या आमदारकीचे अवघड होईल. आता आबांच्या राजकिय अस्तित्वाचं कसे काय होणार? अशी चिंता व्यक्त केली जात आहे.हे सगळं ठीक आहे,सध्या राज्याचे राजकारण बदललेले आहे. पक्षाचे दोन गट तयार झालेले आहेत.तसेच जे राजकीय शत्रू होते ते मित्र झालेले आहेत.अन जे राजकीय मित्र होते ते शत्रू बनलेले आहेत.हा एक वेगळा बदल राज्याच्या राजकारणात झालेला आहे.राज्यात दोस्ती झाली असली तरी निवडणूकीच्या काळात मात्र कुस्त्या करण्याची वेळ सुद्धा सर्वांवर येणार आहे.त्यामुळे निवडणुकीच्या दरम्यान राजकीय समीकरणे कशीही असली,कुणी ही रिंगणात उतरले तरी जी हवा आबांची या मतदारसंघात आहे.ती हवा मात्र आबांची राहणारीच आहे.त्यामुळे आबां समोर किती ही आव्हाने आली तरी सुद्धा आबांनी जनतेच्या मनात जी विश्वासाची पेरणी केलेली आहे.जे एक वेगळं वलय तयार केलेले आहे.त्यास आव्हान देणे विरोधकांना सुद्धा अवघड होऊन बसणार आहे. आबांनी जनतेच्या हृदयात स्थान मिळविलेले आहे.आजही मतदारसंघात आबांचा जनसंपर्क दांडगा असल्याचे पाहायला मिळते.



# महाराष्ट्रातील सेवानिवृत्तांना केंद्र सरकार निवृत्त कर्मचाऱ्यांप्रमाणे लाभ द्या

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्र सरकार व महाराष्ट्र शेजारील राज्यांनी८०वर्ष व त्यावरील  निवृत्तीधारकांना अतिरिक्त वेतन वाढ मंजूर केली, ही महाराष्ट्र राज्यातील ८०वर्ष वरील सेवानिवृत्तांना त्याच दराने व त्याच प्रभावाने द्या,दर महिन्याला केंद्रिय सेवानिवृत्तप्रमाणे वैद्यकीय अंशदान द्या, वृद्धापकाळात पेंशनर्स विविध  शारीरिक व्याधींनी ग्रस्त असतात त्यांना तुटपुंजी पेंशन पुरत नाही म्हणून वैद्यकीय अंशदान मंजूर करा,आयुष्य मान भारत योजनेचे लाभ कोणतीही अट न टाकता राज्यातील पेन्शनर्स द्या,१जानेवारी २०१६नंतर सेवा निवृत्त झालेल्या शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाचे थकीत हप्ते त्वरित द्या,०१जानेवारी,२०२०ते३० जून,२०२१ या १८महिन्याची  महागाई भत्याची थकबाकी त्वरित द्या अशा मागण्याचा एल्गार छत्रपती संभाजीनगर येथील पेन्शनर्स डे दिनी रविवार(ता,१७)रोजी राज्यातील विविध जिल्हयातील व तालुक्यातील पेन्शनर्स संघटनेचे अध्यक्ष यांनी राज्याचे गृहनिर्माण मंत्री व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री ना,अतुलजी सावे यांच्या समोर  मागणी केली व येत्या२७डिसेंम्बर २०२३रोजी मुंबई येथे मंत्रालय येथे आयोजित एक दिवसीय लाक्षणिक संप करण्याची वेळ येऊ देऊ नये, अशी मागणी केली,ना,अतुल सावे यांनी पेन्शनर्सच्या वरील मागण्या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री ना,एकनाथराव शिंदे यांच्या शी याबाबत भेट घालून देऊन चर्चा करून वरील मागण्या मान्य करून घेऊ असे आश्वासन दिले,या प्रसंगी एन, डी,मारणे,महाराष्ट्र राज्य शिखर परिषद पुणे हे अध्यक्ष स्थानी होते, संभाजीनगर  जिल्हाध्यक्ष वसंतराव सबनीस यांनी प्रास्ताविक करून सबनीस यांनी प्रास्ताविक करून पेन्शनर्स डे ची माहिती दिली. आरंभी स्व. डी. एस. नकारा व स्व रीश्वन्द्रराव जोशी यांना अभिवादन करून दीप प्रज्वलन करून पेन्शनर्स डे निमित्त  उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सेवा निवृत्त कर्मचारी वर्गांना स्मृती चिन्ह,शाल व प्रमाण पत्र देऊन गौरविण्यात आले,या प्रसंगी वसंतराव वाबळे(पुणे), जिल्हाध्यक्ष मनोहर पोपाळईत(हिंगोली), गोविंदराव घनतोडे(हिंगोली), शेषराव बीजवार व गवर शेट्टीवार(वर्धा), मधुकर वाबळे (नंदुरबार),सदाशिव सोनवणे(नाशिक), राजेश औंधकर(सांगली)विलास जाधव,जनार्दनअमृतकर(संभाजीनगर), धोंडीरामसिंह राजपूत(वैजापूर), जिजा मोरे(पैठण) यांनी वरील मागण्या सावे समोर मांडून मागण्या मान्य करण्याचा हट्ट धरला, श्रीमती रजनी नागवंशी, प्रमिला कुंभारे, श्रीमती गंगा वाघमारे,सचिव ना मदेव घुगे यांनी सहभाग नोंदवला.

# नांदा तांडा येथे हरिनाम सप्ताहाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथे परवापासून मीक्षदा एकादशी गीता जयंती दिंडी नगर प्रदक्षिणा व श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे गावाकऱ्यांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांना कळविण्यात येते की वै.हभप नारायण महाराज चारुनगर यांच्या प्रेरणेने हभप फुलसिंग महाराज साकेगाव, यांच्या आशीर्वादाने रामदेव बाबा मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, हनुमान मंदिर नांदा तांडा येथे श्रीमद् भागवत सप्ताह सुरुवात केली आहे.याप्रसंगी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांच्या हस्ते हभप लखन महाराज चिंचखेडा याचा व सर्व महाराज लोकांना शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला व श्रीमद् भागवत सप्ताहाला सुरुवात करण्यात आली.वर्ष २० व्यावे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दिनांक १७/१२/३/२३ रविवार पासुन २४/१२/२३ पर्यंत श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे सकाळी पाच ते सहा वाजता काकडा आरती सकाळी 9 ते 12 श्रीमद् भागवत कथा दुपारी तीन ते पाच श्रीमद् भागवत कथा सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ तसेच रात्री आठ ते दहा हरिकीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे या श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते हभप संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा हे आहेत तसेच रविवार दिनांक  ह भ प लखन महाराज चिंचखेडा,हभप प्रलाद महाराज कळमशेरा, हभप शालिग्राम महाराज सुरळकर भालेगांव बाजार,हभप गणेश महाराज मगर वैजापूर,हभप विठ्ठल महाराज शास्त्री चनघटे पैठण, हभप शिवशाही गोपाल महाराज धुळे,हभप तुकाराम महाराज मेहुन मुक्ताईनगर,हभप संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा यांचे सकाळी नऊ ते अकरा काल्याचे कीर्तन होईल तसेच  २४/१२/२३ रविवार रोजी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.याशुभ प्रसंगी महाप्रसाद दारासिंग बंडू चव्हाण,सौ.प्रभावती दारासिंग चव्हाण, यांच्या कडून तर भागवत सेवा प्रेमसिंग मोरसिंग चव्हाण,सौ.कलाबाई प्रेमसिंग चव्हाण, यांच्या कडून तर एकादशी सेवा आत्माराम मोरसिंग चव्हाण,सौ विमलताई आत्माराम चव्हाण यांच्या कडून तर जलपान सेवा लक्ष्मण चव्हाण घाणेगांव यांच्या कडून करण्यात आली आहे. तसेच संध्याकाळी ग्रंथ दिंडी सोहळा गावातून निघणार आहे तरी पंचक्रोशीतील नागरिकांनी कार्यक्रमाचा घ्यावा.



# महापुरुषांना पळवणारी जोडी



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**मित्रांनो सप्रेम जय गुरु. महाराष्ट्रातील अमरावती येथे दिनांक 16 डिसेंबर ते 20 डिसेंबर 2023 दरम्यान एक लोटा जल सब समस्या का हल असा मंत्र देऊन महाराष्ट्रातील बहुजन समाजाला मातीत घालणारे अंधश्रद्धा शिरोमणी प्रदीपजी मिश्रा यांचे शिव महापुराण स्थानिक लोकसभा सदस्य मा.नवनित राणा आणि विधानसभा सदस्य मा. रवी राणा (जोडी) ज्यांना भारतीय संविधानाने वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजेच चिकित्सा करण्याची अर्थात सुधारणा घडवून आणण्याची मनोवृत्ती विकसित करण्यासाठीच जबाबदार म्हणून निर्देश दिलेले आहेत. ही जोडी हनुमान चालीसा साठी प्रसिद्ध आहे.**

देव आणि धर्म ही आपली वैयक्तिक बाब आहे. ईश्वराची प्रार्थना मग ती कुठलीही असो;हनुमान चालीसा का असेना ही आपलं आत्मिक बळ वाढवण्यासाठी करायची आंतरिक उपासना आहे. ती कुठेही लोकांना दाखवण्यासाठी किंवा प्रदर्शन करण्यासाठी नाही ही साधी गोष्ट सुद्धा या जोडप्याला समजू नये! संतांनी या अवडंबराचा जोरदार निषेध केलेला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात *बाह्य वस्तूचे भडकपण | ते आतल्या उनिवेचे प्रदर्शन || महत्त्वास चढता बाह्य आवरण | मोलघटे मानवतेचे || राष्ट्रसंताच्या लेखी अंधश्रद्धेचा बाजार भरवुन या जोडप्याने जो अमरावती मध्ये धुडगूस घातलेला आहे तो मानवतेचं मोल घटवणारा आहे. लोककल्याणकारी राज्य निर्माण करणाऱ्या सरकारी व्यवस्थेचे आपण घटक असून गोरगरीब, दुःखी,असाह्य जनसामान्यांना शिक्षण, रोजगार आणि आरोग्यासारख्या सुविधा पुरवून त्यांचे अश्रू पुसणे हाच आपला खरा धर्म आहे. हा मानवधर्म (जो सर्व धर्माच्या मुळाशी आहे) ही जोडी विसरलेली आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून सर्वश्रुत आहे आणि त्यात अमरावती हे तर आधुनिक संतांचं माहेर घरच म्हणावं लागेल.कारण या अमरावतीच्या मातीत तीन अनमोल हिरे जन्माला आले आणि त्यांनी आपल्या असामान्य कर्तृत्वाने या अमरावती जिल्ह्यातील मातीचा प्रत्येक कण पवित्र केला आहे. आपण म्हणत असतो की सोन्याला जर सुगंध असता तर ! पण खऱ्या अर्थाने या अमरावती जिल्ह्यातील खराटा, खंजिरी आणि खडू घेऊन या तीन महापुरुषांनी इथल्या दबलेल्या पिचलेल्या बहुजन समाजाची ज्या ब्राह्मणी व्यवस्थेने पार माती करून टाकली होती त्याच मातीवर पुन्हा मानवतेचे संस्कार करून ताठ मानेने जगणारा मौल्यवान माणूस घडवणारे हे तीन कुंभार त्यांच्या साहित्याने आणि कार्यकर्तृत्वाने मातीचा माणूस माणसाचं सोनं आणि सोन्याला सुगंध आला तो अस्मितेचा. ही अस्मिता त्याला कुठल्याही लुंग्या सुंग्या बुवाच्या चरणी झुकवणारी वाकवणारी नसून ताठ मानेने उभे करणारी होती.

गाडगेबाबांचा खराटा म्हणजे वैदिकांनी इथल्या बहुजन समाजाच्या मस्तकावर कोरलेला दैववाद,नशीब, अर्थात कर्मवीपाक सिद्धांत खोडून काढणारं इरेझर ! गाडगेबाबा म्हणजे विज्ञान आणि तर्काचं अजब रसायन !गाडगे बाबा म्हणजे इथल्या बहुजन समाजाच्या डोक्यात वैदिकांनी वाढवून ठेवलेल्या घातक रुढ्यांचे झुडपं उखडणारा, अंधश्रद्धेचे खोल खाच खडगे बुजवणारा,बुवाबाजीचं अनावश्यक गवत आपल्या तर्काच्या नांगरणे खरडून काढणारा बहुजन समाजाच्या डोक्यातील नापिक जमिनीला सुपीक बनवून वैज्ञानिक दृष्टिकोन पेरणारा उद्यमी कास्तकार. ज्या घरात आईला देवाचं व्यसन आहे ते घर कधीही प्रगती करू शकणार नाही असं गाडगे महाराज का म्हणत होते याचा विचार आता तरी बहुजन समाजाने केला पाहिजे. कार्यकारण भाव कळावा यासाठी हा अक्षरशत्रू असणारा संत म्हणायचा एका खोलीत नवऱ्याले ठेवा, दुसऱ्या खोलीत बायकोला आणि लेकरू झालं तर मला फाशी द्या. बहुजन समाजाच्या डोक्यात अशा विचाराच्या ठिणग्या पेटवुन त्यांना अंतर बाह्य प्रकाशित करणाऱ्या गाडगेबाबांच्या पावन पवित्र अमरावतीत हा अंधश्रद्धेचा बाजार कशासाठी ? राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे अस्सल पुरोगामी संत चमत्काराच्या भरी भरोनी |




झाली कित्येकाची धुळधाणी | संत चमत्कार यापुढे कोणी| नका वर्णू सज्जन हो| संत बिमारी बसवती| तरी बुवाचेची का प्राण जाती| जगी कोणीच न मरती| असे का न व्हावे| तर्काच्या आधारावर असे प्रश्न उपस्थित करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी या चमत्कारी बुवाबाजीचा चांगलाच समाचार घेतलेला आहे. भुलू नका चमत्कारा, कोणी जगीही थापची सारी असं म्हणून या चमत्काराच्या थापा मारणाऱ्या थापाड्यांना लाताडणाऱ्या राष्ट्रसंतांच्या भूमीत अंधश्रद्धेची पुंगी वाजवणाऱ्या गारोड्यांचा हैदोस कशासाठी?

तिसरा अत्यंत महत्वाचा वारसा म्हणजे भाऊसाहेब पंजाबराव देशमुख ! भाऊसाहेब पंजाबराव देशमुख म्हणजे बहुजन समाजाचे उद्धारकर्ते. सर्व सामान्य गोरगरिबांचे कैवारी स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री. शिक्षणाशिवाय वैदिकांनी गुलाम केलेल्या बहुजन समाजाची मुक्तता होणार नाही म्हणून सर्वसामान्यांसाठी श्री शिवाजी शिक्षण संस्था निर्माण करणारे आणि गोरगरीब शेतकऱ्याच्या झोपडीत जाऊन मंत्री असूनही कुठला अहंकार न बाळगता त्याची चटणी भाकर खाऊन त्याला आपलंसं करणारे शेतकऱ्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने क्रांती घडवून आणणारे कर्तव्य शूर नेते. खऱ्या अर्थाने या कर्तव्यशून्य राणा दांपत्याने भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या चरणावर आपलं मस्तक चांगलं लाल येईपर्यंत घासायला पाहिजे. तेव्हाच त्यांच्या डोक्यामध्ये काहीतरी प्रकाश पडेल. स्वतःची शेती विकून प्रसंगी परदेशात जाणारे कणाकणाने ज्ञान मिळवून समृद्ध होऊन समाजाला सुद्धा समृद्ध करणारे भाऊसाहेब पंजाबराव देशमुख कुठे आणि बेलपत्री शहदा मध्ये बुडवून शिवलिंगला चिटकवून इथल्या तरुणांना अंधश्रद्धेच्या खड्ड्यात लोटणारे पोंगा पंडित कुठे ?

मित्रांनो भगवान शिव हेआपले आदी पुरुष आहे. भगवान शिव ही अवैदिक देवता आहे.आपल्या वैदिक सांस्कृतिक प्रवाहामध्ये अशी अवैदिक महापुरुषांमध्ये असणारी प्रचंड कर्तृत्व शक्ती, असामान्य प्रतिभा, सर्वसामान्यांसाठी कमालीची संवेदनशीलता आणी त्यांची बरोबरी तर जाऊ द्या पण त्यांच्या पायाच्या नखाची सुद्धा बरोबरी करणारी मंडळी नसल्यामुळे या अवैदिक परंपरेला नष्ट करण्यासाठी त्यांनी तीन कलमी कार्यक्रम आखला आहे.1) महापुरुषाची बदनामी करणे 2) त्यांची हत्या घडवणे 3) त्या महापुरुषांना ते आमचेच होते असे सांगून त्यांना पचवून टाकने प्रदीप मिश्रा हा अंधारात लुकलुकणारा तर्कहिन काजवा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,वैराग्यमूर्ती गाडगे बाबा ह्या तर्काच्या सूर्यापुढे तो क्षणभरही टिकणार नाही. म्हणून या संत महापुरुषांना या भटोबांच्या पंगतीत बसवण्याचे हे षडयंत्र. संजय आवटे सरांचं एक पुस्तक आहे. बापांना पळवणारी टोळी हे आपल्याला माहीतच आहे पण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि गाडगे बाबांचे फोटो लावून संत महापुरुषांना पळवणारी ही जोडी आपण सर्वप्रथम पाहत आहोत.माझी राणा दांपत्यांना विनंती आहे की त्या प्रदीप मिश्रांना घेऊन तुम्हाला काय उपदव्याप करायचे ते करा. अगदी बिना नवऱ्यानी बायकांना पुत्र प्राप्ती होत असेल त्यासाठी पुत्र कामेष्टी यज्ञ करायचे असेल काय झक मारायची असेल ते तुमच्या चेल्या चपातट्यांना घेऊन तिकडे मारा. परंतु राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी गाडगे बाबा यांचा वापर अंधश्रद्धा पसरवण्यासाठी जर आपण करत असाल तर हे आम्ही खपवून घेणार नाही. जर पुन्हा असा उपद्वाप केला तर तुम्हाला याच शब्दांमध्ये प्रत्युत्तर देण्यासाठी राष्ट्रसंताचे अनुयायी म्हणून आम्ही तयार आहोत.

# हरित ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक आणि रोजगाराच्या अफाट संधी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**भारताने 2030 पर्यंत ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी नवीन पंचवार्षिक योजना तयार केली आहे. या योजनेच्या मदतीने, देश 500 गिगावॅट (GW) गैर-जीवाश्म इंधनावर आधारित विजेचे उद्दिष्ट साध्य करू शकेल. केंद्र सरकारने पुढील पाच वर्षांसाठी प्रतिवर्षी 50 गिगावॅट अक्षय ऊर्जा क्षमतेसाठी निविदा मागवल्या आहेत. इतकेच नाही तर, 'इंटर-स्टेट ट्रांसमिशन' (आंतर-राज्य पारेषण -ISTS) अक्षय ऊर्जा क्षमतेसाठीच्या या वार्षिक बोलींमध्ये प्रतिवर्षी किमान 10 गिगावॅट पवन ऊर्जा क्षमता स्थापित करणे देखील समाविष्ट असेल.**

ही घोषणा अल्पकालीन आणि दीर्घकालीन अक्षय ऊर्जा क्षमता जोडण्याच्या दृष्टीने आणि 2030 पर्यंत 500 गिगावॅट गैर-जीवाश्म इंधन क्षमतेचे लक्ष्य साध्य करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. भारत जगातील ऊर्जा संक्रमणामध्ये जागतिक नेता म्हणून उदयास येत आहे. अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात आपण केलेल्या प्रगतीवरून हे स्पष्ट होते.

नवीकरणीय ऊर्जा क्षेत्र देखील रोजगाराच्या दृष्टिकोनातून आशादायक दिसते. हवामान बदलाचे धोके रोखण्यासाठी संपूर्ण जग या क्षेत्राचा विकास करण्यात व्यस्त असताना, भारताने या संसाधनाच्या विकासात चांगले यश मिळवले आहे. गेल्या दहा वर्षांत देशाने अक्षय ऊर्जा निर्मितीची क्षमता पाचपट वाढवली आहे. यासोबतच ऊर्जा उत्पादनाच्या क्षेत्रात 2030 पर्यंत नवीन उद्दिष्टेही निश्चित करण्यात आली आहेत. एका अहवालानुसार, नवीन उद्दिष्ट पूर्ण करण्यात यश मिळाले तर 2030 पर्यंत या क्षेत्रात सुमारे 15 लाख रोजगार निर्माण होतील. चीन, ब्राझील आणि अमेरिकेनंतर अक्षय ऊर्जा क्षेत्रात रोजगार निर्मितीच्या बाबतीत भारताचा जगात चौथा क्रमांक लागतो. संपूर्ण जगात नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांपैकी 5.7 टक्के लोक भारतात आहेत. इंटरनॅशनल रिन्यूएबल एनर्जी एजन्सी (IRENA) च्या अहवालानुसार, 2014 पर्यंत अक्षय ऊर्जा क्षेत्राने भारतात चार लाख रोजगार निर्माण केले होते.

वास्तविक, भारतामध्ये ऊर्जा क्षेत्रात विकासाची भरपूर क्षमता आहे आणि या क्षेत्रात जाण्यासाठी विद्यार्थ्यांना काही विशेष अभ्यास करणे आवश्यक आहे. ऊर्जा क्षेत्रात बी.टेक पॉवर, एमबीए ऑइल अँड गॅस, एमए एनर्जी इकॉनॉमिक्स, सोलर एनर्जी इत्यादी विषयांशी संबंधित अनेक कोर्सेस आहेत, परंतु आगामी काळात सर्वात मोठी क्षमता सौरऊर्जेमध्ये आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारताला पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी ऊर्जा क्षेत्रामध्ये सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. गुंतवणुकीबद्दल बोलायचे झाले तर 2000 ते 2019 दरम्यान भारताच्या ऊर्जा क्षेत्रात 14.32 अब्ज डॉलरची परकीय गुंतवणूक आली आहे. सरकार या क्षेत्राकडे विशेष लक्ष देत आहे, त्यामुळे आगामी काळात या क्षेत्रातील गुंतवणूक आणखी वाढेल. त्यामुळे नोकरीच्या शक्यताही वाढतील. भारत सरकारने अक्षय ऊर्जा (सौर ऊर्जा, पवन ऊर्जा इ.) ची क्षमता 2022 पर्यंत 175 गिगावॅट पर्यंत वाढवली आहे. यामध्ये 100 गिगावॅट सौर ऊर्जा आणि 60 गिगावॅट पवन ऊर्जा समाविष्ट आहे. भारताची कोळसा आधारित क्षमता 2040 पर्यंत 191 गिगावॅटवरून 400 गिगावॅट पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. ऊर्जा उत्पादनासाठी भारत दीर्घकाळापासून कोळशावर अवलंबून असला तरी गेल्या दशकाच्या मध्यापासून हरित ऊर्जेचा सहभाग लक्षणीय आहे. 2017 पासून, हरित ऊर्जा निर्मितीच्या नवीन पद्धतींमध्ये आघाडीवर आहे, ज्यामध्ये सौर उर्जेचा सिंहाचा वाटा आहे. तंत्रज्ञानातील सुधारणा आणि सौर पॅनेलच्या किमतीत सातत्याने होणारी घट हे उद्दिष्ट साध्य करण्यात मदत करत आहेत. २०१० मध्ये देशात सौरऊर्जेची निविदा १२ रुपये प्रति किलोवॅट होती, ती २०२० मध्ये दोन रुपये प्रति किलोवॅटवर आली. सध्या ही वीज निर्मितीची सर्वात स्वस्त पद्धत आहे. यामुळेच नवीन ऊर्जा क्षमता प्राप्त करण्यासाठी सौरऊर्जेला सर्वाधिक प्राधान्य दिले जात आहे. 2022 मध्ये भारतात जोडलेल्या नवीन उर्जेपैकी 92 टक्के ऊर्जा केवळ सौर आणि पवन आधारित होती. अशा प्रकारे हरित ऊर्जा हा देशातील उर्जेचा एकमेव स्त्रोत बनत आहे. भारतात विजेचा वापर वाढत आहे आणि हरित ऊर्जा हा सर्वात आकर्षक पर्याय आहे. गुंतवणूकदारही पैसे गुंतवण्यासाठी आणि नफा मिळविण्यासाठी या क्षेत्राकडे पाहू



लागले आहेत. केंद्र सरकारचा अंदाज आहे की गेल्या सात वर्षांत अक्षय ऊर्जेमध्ये 70 अब्ज डॉलर (सुमारे 5.6 लाख कोटी) पेक्षा जास्त गुंतवणूक केली गेली आहे, तरीही हे क्षेत्र अजूनही विस्तारत आहे.

भारतीय हरित ऊर्जेशी संबंधित अनेक क्षेत्रे आहेत ज्यात गुंतवणुकीची नितांत गरज आहे. हरित ऊर्जेचे उत्पादन हा त्याचा एक पैलू आहे. गुंतवणुकीसाठी अनेक क्षेत्रे आहेत, पुरवठा साखळी उभारण्यापासून ते सौर पॅनेल आणि पवन टर्बाइन तयार करणे, वितरित ऊर्जा प्रकल्पांमध्ये ते स्थापित करणे आणि आवश्यक आधुनिक ग्रिड उभारणे. यामध्ये सॉफ्टवेअरवरील अवलंबित्वही वाढले आहे.

इथे गुंतवणुकीचीही भरपूर शक्यता आहे. खरं तर, पॉवर ग्रीड सुरळीतपणे कार्यरत आहे याची खात्री करण्यासाठी ग्रीन एनर्जीला सॉफ्टवेअरची आवश्यकता असते. या परिसराच्या विकासासाठी हे महत्त्वाचे आहे.

जगभरातील देशांना कोळसा आणि इतर जीवाश्म इंधनांपासून दूर जाण्याची आणि हरित ऊर्जेला पाठिंबा देण्याची अनेक कारणे आहेत. हरित ऊर्जा क्षेत्रात देशी-विदेशी कंपन्यांच्या गुंतवणुकीची प्रचंड क्षमता आहे. ऊर्जा संक्रमणाचा वेग ज्या प्रकारे वाढत आहे, ते पाहता आगामी काळात भांडवली प्रवाहात वाढ होणार आहे. भारतीय हरित ऊर्जा क्षेत्रातील परकीय गुंतवणूक 2014 पासून सातत्याने 4,100 कोटी रुपयांच्या वर राहिली आहे, परंतु 2017 पासून दरवर्षी 1 अब्ज डॉलर (रु. 8,200 कोटी) चा टप्पा ओलांडत आहे. जगभरातील भांडवली बाजार नियामक कारणास्तव तसेच दीर्घकालीन फायद्यांसाठी हरित तंत्रज्ञानामध्ये गुंतवणुकीकडे वळत आहेत. याचा अर्थ हरित ऊर्जेमध्ये उपलब्ध भांडवल गुंतवण्याचे धोके कमी होतात.

एक पैलू असा आहे की, सध्या भारताची उर्जेवर इतर देशांवरील अवलंबित्व खूप जास्त आहे. ऊर्जा क्षेत्रात देशाला स्वावलंबी बनवण्यासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. या क्रमाने, अक्षय ऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावत आहे, ज्यासाठी सरकार सौर उर्जेच्या क्षेत्रात खूप काम करत आहे. भारताने 2070 पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ज्यासाठी नूतनीकरणक्षम स्त्रोतांमधून सुमारे 50 टक्के ऊर्जा निर्मिती करण्याचे मोठे लक्ष्य आहे. भारताने 2040 पर्यंत नवीकरणीय स्रोतांमधून 15,820 टेरावॅट-तास वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले आहे. अशा स्थितीत हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सौरऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावू शकते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध कंपन्या सौरऊर्जेच्या क्षेत्रात वेगाने काम करत आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील कंपन्यांमध्ये अजूनही चांगली वाढ होताना दिसत आहे. आगामी काळात या कंपन्यांच्या वाढीला वेग आल्याने भारत ऊर्जा क्षेत्रातील सर्व उद्दिष्टे यशस्वीपणे साध्य करेल.

# गोवा मुक्ती दिन



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र्य झाला. दीडशे वर्ष राज्य करून इंग्रज भारतातून निघून गेले. संपूर्ण देशात स्वातंत्र्याची पहाट उगवली पण भारतातील एक छोटेसे निसर्गरम्य बेट असलेले गोवा मात्र पारतंत्र्यातच होते. गोव्यावर पोर्तुगीजांची सत्ता होती. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोव्यात पाय ठेवला तेंव्हापासून गोमंतकीय जनतेचे नष्टचर्य सुरू झाले होते. तब्बल साडेचारशे वर्ष पारतंत्र्यात राहिलेल्या गोव्याचे नष्टचर्य १९ डिसेंबर १९६१ रोजी संपले. १९६१ च्या युद्धानंतर भारतभूमीवरील उरलेसुरले पोर्तुगीज अधिपत्य समाप्त झाले, तसेच गोवा, दमन व दीव हा प्रदेश मुक्त झाला.**

कोकण पासून पेडणेपर्यंत पसरलेली गोव्याची निसर्गरम्य भूमी १९ डिसेंबर १९६१ रोजी भारताशी एकरुप झाली अर्थात १९६१ चे युद्ध हा गोवामुक्ती आंदोलनाचा निर्णायक भाग होता पण गोवा मुक्ती आंदोलनाला खूप मोठा इतिहास आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वातंत्र्य झाल्यानंतर देशातील ५६५ संस्थाने भारतात विलीन झाले पण पोर्तुगीजांनी गोवा, दीव, दमन, दादरा आणि नगरहवेली या आपल्या वसाहतीतुन जाण्यास स्पष्ट नकार दिला. ते गोव्याचे भारतात विलीनीकरण करण्याच्या बाजूने नव्हते. पंतप्रधान पंडित नेहरु हे पोर्तुगीज वसाहतीशी चांगले संबंध प्रस्थापित करीत होते पण तेथील प्रशासक मात्र त्यांना सहकार्य करीत नव्हते. गोमंतकीय जनताही पोर्तुगीजांच्या अत्याचाराला कंटाळून भारतात विलीन होण्यासाठी भारत सरकारने सहकार्य करावे अशी मागणी करीत होते. पोर्तुगीज गोव्याला भारतात विलीन करण्याच्या विरोधात होते पण जनतेला मात्र भारतात विलीन व्हावे असे वाटत होते. गोमंतकीय जनतेची इच्छा ओळखून पंतप्रधान नेहरू यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या माध्यमातून पोर्तुगीजांवर दबाव आणला. शांततेच्या मार्गाने भारत सोडून जाण्याचा संदेश त्यांनी पोर्तुगीजांना दिला पण पोर्तुगीजांनी या संदेशाला जुमानले नाही. शांततेच्या मार्गाने पोर्तुगीज देश सोडून जात नाहीत, वाटाघाटी यशस्वी होत नाहीत हे लक्षात आल्यावर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी लष्कराला कारवाईचे आदेश दिले. भारताने लष्करी कारवाई करू नये म्हणून पोर्तुगीजांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीज सरकारची जुलूमशाही आणि आंदोलनाला मिळणारा जनतेचा तीव्र प्रतिसाद या पार्श्वभूमीवर नेहरुंनी




१७ डिसेंबर १९६१ रोजी आंतरराष्ट्रीय दबावाला न जुमानता भारतीय सैन्य गोव्यात घुसवण्याचा निर्णय घेतला. भारतीय सैन्याने पोर्तुगिजांचा पूर्ण पाडाव करुन १९ डिसेंबर १९६१ रोजी गोव्यात तिरंगा फडकवला आणि गोवा मुक्त झाला. साडेचारशे वर्ष पारतंत्र्यात असणाऱ्या गोव्यात स्वातंत्र्याची पहाट उगवली. दीव, दमन आधीच मुक्त झाले होते. या तिघांना मिळून केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिला. नंतर १९६७ साली सार्वमताने गोवा घटक राज्य म्हणून घोषित झाले. पोर्तुगिजांच्या गुलामीतून मुक्त होऊन आज गोव्याला तब्बल ६२ वर्ष पूर्ण झाली. गोवा मुक्ती संग्रामाचे हे ६२ वे वर्ष आहे. यानिमित्ताने गोव्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. गोवामुक्ती दिनाच्या गोमंतकीय जनतेला मनापासून शुभेच्छा!

# वेगावर नियंत्रण आणा ; अपघात रोखा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**नागपूर येथील काटोल मार्गावरील सोनखाब ताराबोळी शिवारात लगत क्वालिस आणि ट्रकची भीषण धडक होऊन झालेल्या अपघात ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. क्वालिस गाडी नागपूरवरून काटोलच्या दिशेने जात होती. त्यावेळी ट्रकने जोरदार धडक दिली आणि त्यामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला. नागपुरात एका लग्नाचा कार्यक्रम आटपून हे सर्वजण काटोलच्या दिशेने जात होते. असे अनेक अपघात महाराष्ट्रासह भारताच्या काना कोपऱ्यात मोठया प्रमाणावर होत आहे..रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण चिंताजनक बाब आहे. ठराविक ठिकाणी अपघात रोखण्यासाठी उपाययोजना राबविल्या म्हणजे अन्य ठिकाणच्या अपघातांनाही ब्रेक लागणार असे नाही. वाहनचालकांतील बेदरकारपणा वाढत्या अपघातांमागील प्रमुख कारण आहे.**

दारू पिऊन वाहन चालविण्याचा 'आनंद' घेणारे मोठ्या संख्येने आहेत. भन्नाट वेग हे दोन्ही ठिकाणी समान 'तत्व' आहे. महाराष्ट्रासह देशात रस्ते अपघातांचे प्रमाण भयावह असून त्यात दरवर्षी वाढ होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित येणारी वाहने ही अभिमानाची बाब असली तरी दुसरीकडे त्यांचा वेग आपल्याकडील रस्त्याला मानवणारा नसल्याचे लक्षात घ्यावे लागेल. रस्त्यांचे, महामार्गांचे जाळे पसरत चालले असले तरी बऱ्याच ठिकाणी त्याचा दर्जा टुकार आहे. ज्या ठिकाणी रस्त्यावर पोलीस तपासणी, इतर अडथळे असतात त्या ठिकाणी शिस्तीत (!) धावणारी वाहने अन्य रस्त्यांवर सुसाट धावतात. तेथे चालकांना कसले भय वाटत नाही. वेडवाकडे ओव्हरटेक, प्रमाणापेक्षा वेग वाढवणे असे प्रकार तेथे घडतात आणि त्यातून अपघाताचा धोका वाढतो. राज्यातील रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न होत असतानाही त्यात यश मिळालेले नाही. गेल्या दोन वर्षांत राज्यात ५९,५९७ रस्ते अपघात झाले असून त्यात २७,०८४ जणांचा मृत्यू झाला. २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये (जानेवारी ते नोव्हेंबर २०२२) वाढ झाली आहे.राज्यातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी राज्य सरकार वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि विविध सामाजिक संस्थांना घेऊन दर वर्षी रस्ते सुरक्षा मोहीम राबविते. या मोहिमेनंतरही अपघातांचे प्रमाण कमी होत नाही. राज्यात २०२१ मध्ये आणि जानेवारी ते नोव्हेंबर २०२२ मध्ये रस्ते अपघातांत ४७,७९३ जखमी झाल्याची माहिती वाहतूक पोलिसांकडून देण्यात आली. एकूण अपघातांपैकी २०२१ मध्ये २९ हजार ४७७ अपघात आणि १३ हजार ५२८ मृत्यू झाले असून २०२२ मध्ये ३० हजार १२० अपघातांमध्ये १३ हजार ५५६ जणांचा मृत्यू झाला आहे. जखमींमध्येही वाढ असून २०२२ मध्ये २४ हजार ७२२ जखमींची नोंद वाहतूक पोलिसांकडे झाली असून २०२१ मध्ये हीच संख्या २३ हजार ७१ आहे. अपघातांची आकडेवारी दरवर्षी वाढत आहे. द्रुतगती मार्गावर वाढते अपघात रोखण्यासाठी इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (आयटीएमएस) बसविण्यात आली आहे. याचा उपयोग वाहनांच्या वेगावर मर्यादा ठेवतानाच वाहतुकीला शिस्त यावी यासाठी आहे. या यंत्रणेमुळे अपघातात घट झाल्याचा दावा केला जात आहे. त्यात तथ्य असेल तर ही बाब नक्कीच स्वागतार्ह आहे. अलीकडे बोरघाटात ढोल पथकाच्या बसला झालेल्या अपघानंतर द्रुतगतीप्रमाणे मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरही अशी यंत्रणा बसविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. बोर घाटात बस दरीत कोसळल्याने मुंबईतील १३ जणांचा मृत्यू झाला होता. वर्षभरात या महामार्गावर चौदाशे एकोणनव्वद(१४८९) अपघात झाले यातील ७३ प्राण्यांतिक अपघातात १४२ जणांचे जीव गेले त्यामुळे सुरुवातीला महाराष्ट्राची भाग्यरेषा म्हणून ओळख निर्माण झालेला हा मार्ग आता मृत्यूचा मार्ग ठरत चालला की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे विशेष म्हणजे गंभीर अपघात झाल्यावरच नेते अधिकारी केवळ विविध उपाय योजनांची घोषणा करतात परंतु ते कागदावरच राहत असल्याचे अपघातांचे सत्र सुरूच आहे.मुंबई ते नागपूरपर्यंतचा हा मार्ग आहे. त्याचे काम नागपूर ते शिर्डी इतके झाले असून उर्वरित काम सुरू आहे. संपूर्ण मार्ग तयार होईल तेव्हा अपघाती घटना वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन आतापासूनच अपघात प्रतिबंधक उपाययोजना केल्या पाहिजेत.

आपल्याकडे रस्त्यांचा दर्जा सुमार राहिलेला आहे. फारच थोडे असे रस्ते आहेत की त्यावरील प्रवास सुखावह असतो. सुमार दर्जाच्या रस्त्यावरून वाहन सुसह्य मार्गावर धावू लागले की त्याचा वेग वाढविण्यात येतो. अनेकदा वाहनांत वेगाची शर्यत सुरू असल्याचा भास होतो. ओव्हरटेकचा प्रयत्न करताना बऱ्याचदा निष्काळजीपणा दाखविण्यात येतो. अपघातांचे प्रमाण वाढत असले किंवा अपघातामागचे कारण लक्षात येत असले तरी 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' असे कधी होत नाही. घडलेली घटना विसरून आपल्याच मस्तीत वाहन चालविण्यात धन्यता मानली जात आहे.

आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आजच्या वाहनांची रचना आहे. पूर्वी अवजड किंवा मल्टी ॲक्सल वाहन चालविताना चालकाचा हात थकून जात असे. आता तशी परिस्थिती नाही. या वाहनाचा चालक वेळप्रसंगी रुबाबात एका हातात स्टेअरिंग पकडून रस्ता पार करीत असतो. पॉवर स्टेअरिंग आणि इतर सुविधांमुळे अवजड वाहने सुसाट वेगाने पळताना दिसतात. छोट्या चारचाकी वाहनांमधील झालेले बदल वेग वाढविण्यासाठी सहाय्यभूत ठरत आहेत. योग्य वेग वाढविण्यावर कुणाचा आक्षेप असणार नाही, पण वेग वाढविताना आसपासच्या परिस्थितीचे भान राखले जात नाही. वळणावर ओव्हरटेक करू नये हा साधा नियम असताना त्याकडे दुर्लक्ष केले जाते. शहरातून येणाऱ्या वाहनांच्या चालकांना वळणावळणाच्या रस्त्याचा अंदाज नसला तरी बिनधास्त ओव्हरटेक केले जातात असे कित्येकदा निदर्शनास आले आहे.

प्रवासी वाहन चालविताना वेगाचे भान राखले जात नाही. रात्रीच्या वेळी धावणाऱ्या प्रवासी बस वाऱ्याशी स्पर्धा करावी अशा वेगाने चालविल्या जातात. महामार्गावर हॉटेल किंवा धाब्यांवर या बस थांबतात तेव्हा हॉटेल किंवा धाब्याच्या मालकांकडून त्यांच्या चालकांची 'उत्तम' बडदास्त ठेवली जाते. काही चालक तेथे दारू ढोसून नंतर वाहन चालवत असल्याचे किती तरी वेळा आढळून आले आहे. यावर कोणतीच कठोर कारवाई होत नसल्याने साराच आनंदीआनंद आहे. अपघाताची घटना घडली की मग सारवासारव करण्यासाठी कारवाईचा दंडुका उगारल्याचे चित्र उभे केले जाते. सणासुदीत किंवा लग्न समारंभात रस्त्यावर वाहनांची संख्या इतर दिवसांच्या तुलनेत काही पटीने वाढते. या कालावधीत अपघातांचे प्रमाण वाढलेले दिसते ते केवळ आणि केवळ चालकाच्या बेफिकीरीमुळे!

पैसे कमविण्याच्या हव्यासापोटी छोटी-मोठी प्रवासी वाहने या दिवसांत अधिक प्रमाणात रस्त्यावर आलेली दिसतात. चालक पुरेशी विश्रांती न घेताच वाहन चालवितात. . अलिकडे समृध्दी मार्गावर वाहन चालकाला आलेल्या डुल किमुळे मोठा अपघात झाला होता. संपुर्ण ट्रॅव्हल्स जळून खाख झाली..२५ प्रवाशांचा कोळसा झाला.रात्रीचा प्रवास सुखदायी वाटत असला तरी चालकाला विश्रांती मिळालेली नसेल तर पहाटेच्या वेळी त्याला डुलकी लागण्याची शक्यता असते हे प्रवासीही लक्षात घेत नाहीत. रात्रीचा प्रवास सुरू करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचना वारंवार केल्या गेल्या असल्या तरी त्याकडे दुर्लक्ष करण्यात धन्यता मानण्यात येते.

वाहनांच्या अपघातांचे वाढते प्रमाण पाहिले की 'वेगावर नियंत्रण आणा व अपघात रोखा ' तरच अपघात रोखता येईल. गाजावाजा करून अपघात रोखता येणार नाहीत. चालकांचे समुपदेशनही झाले पाहिजे. काही महाभाग असे आहेत की चालकाला अनुभव नसताना त्याच्या हाती वाहन सोपवतात. छोट्या वाहनांच्याबाबतीत हा प्रकार अधिक प्रमाणात पहावयास मिळतो. वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून वाहन चालविणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. लेनची शिस्त पाळण्याबाबतही दुर्लक्ष केले जाते. लेन आखून दिल्या म्हणजे त्यामागे निश्चित असे काही नियम असल्याचे चालकांच्या लक्षातच येत नाही. मोठी वाहने उजवीकडच्या लेनमधून, तर छोटी वाहने डावीकडील लेनमधून धावत असल्याचे दृश्य आता सर्वसामान्य झाले आहे. पोलीस किंवा आरटीओकडून होणाऱ्या कारवाईबाबत कुणाला भय राहिलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. वाहतूक पोलीस किंवा आरटीओकडून शिस्तीचा किंवा कारवाईचा बडगा ठराविक ठिकाणीच नाही तर सर्वत्र उचलला जात असल्याचे पहायला मिळाले तर वाहनचालकांना जरब बसेल. कारवाई करताना होणाऱ्या अर्थपूर्ण तडजोडीही बंद झाल्या पाहिजेत. चालकांच्या बेपर्वाईमुळे वाहन अपघात होतात हे स्पष्ट झाल्याने चालकांवर यंत्रणांचा जरब असलाच पाहिजे. कारवाई करताना डावे-उजवे होत नाही असे जेव्हा चालकांच्या लक्षात येईल तेव्हा सर्वचजण सुतासारखे सरळ येतात की नाही ते पहा!

# वाचनाचं वेड आणि आवडती पुस्तके...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**सहाव्या वर्गात असताना स्वातंत्र्य सैनिक कालिदासराव देशपांडे व गणेशराव गुळवे गुरुजी यांनी अवांतर वाचन म्हणजे काय आणि त्यासाठी कोणती पुस्तके वाचावीत याबाबत अनेक वेळा मोलाचा सल्ला दिला होता.पण पुस्तके विकत घेऊन ती पुस्तके वाचण्याची समज आली नव्हती. अभ्यासक्रमाची पुस्तके मात्र पुन्हा पुन्हा वाचण्याचा छंद जडला होता. पुढे बारावी पर्यंत ही मी फक्त अभ्यासाची पुस्तके वाचत असे. लातूर येथील राजर्षी शाहू कॉलेज मध्ये बी.एस्सी.प्रथम वर्षाला असताना मी पूर्णतः वाचनाकडे वळलो.शाहू कॉलेजचे ग्रंथालय भव्य दिव्य आणि दर्जेदार पुस्तकांचा खजिना होते. त्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल मला दर आठवड्याला अभ्यासक्रमाचे एक आणि अवांतर वाचनाचे एक पुस्तक वाचनासाठी देत असत.**


सुरुवातीला मी ती पुस्तके वाचायची म्हणून कसेबसे वाचत असे. हळूहळू ही सवय मागे पडली आणि मला वाचनाचा छंद जडला. झपाटल्यागत मी पुस्तके वाचत असे आणि त्यातील आवडते संदेश व मार्मिक वाक्यांचे टिपण वहीत नोंद करत असे.

व्यक्तीला पुस्तके वाचण्याची एकदा आवड निर्माण झाली की तो एका वेगळ्या दुनियेत रममाण होतो.त्या दुनियेत तो एकटा असला तरीही तो आनंदी असतो.कारण वाचन केलेल्या पुस्तकांतील आवडत्या व्यक्तिरेखा त्याच्याशी हितगुज साधतात,संवाद करतात व मनसोक्त गप्पा मारतात.त्यामुळे माणूस त्याच्या प्रत्यक्ष जीवनातील दुःख विसरून जातो.माझ्या जीवनातही पुस्तकांनी असाच बदल घडवून आणला.व्यक्तींपेक्षा व मित्रांपेक्षा मला पुस्तकांचा सहवास जास्त आवडू लागला. पुस्तके वाचता वाचता दर्जेदार व वाचनीय पुस्तके कोणती व सुमार दर्जाची पुस्तके कोणती याची समज येऊ लागली.बाबा कदम, द.मा. मिरासदार,जी.ए.कुलकर्णी, सुहास शिरवाळकर,शंकर पाटील अशा साहित्यिकांचे कथासंग्रह व कादंबऱ्या मी मनोरंजनासाठी वाचत असे.त्यानंतर महामानव, समाजसुधारक व विचारवंतांची जीवनचरित्रे वाचल्याने वाचनाची आवड बदलली.छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले,राजर्षी शाहू महाराज,महात्मा गांधी,भगत सिंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,नेताजी सुभाषचंद्र बोस,अण्णाभाऊ साठे, स्वामी विवेकानंद यांचे जीवनचरित्रे वाचल्याने माझ्या वाचनात प्रगल्भता आली. वाचनछंदात मनसोक्तपणे मी स्वतःला हरवून बसलो. ज्या लेखकांची पुस्तके मला जास्त आवडू लागले त्या लेखकांची पुस्तके वाचण्याचा छंद विलक्षण आनंद देऊन गेला. प्रेमचंद,महादेवी वर्मा,वि.स.खांडेकर,ना.सि.फडके, अण्णाभाऊ साठे,साने गुरुजी, विश्वास पाटील, रणजित देसाई, पु.ल.देशपांडे,शंकरराव खरात, उत्तम कांबळे, मिलिंद बोकील, शिवाजी सावंत,यशवंत मनोहर, सुधा मूर्ती, शिवाजी सावंत, व.पु.काळे या लेखकांचे जास्तीत जास्त साहित्य मी वाचले. या साहित्यिकांची पुस्तके पुन्हा पुन्हा वाचावीत असे नेहमी माझ्या मनाला वाटत असे. या वाचनछंदाने माझ्या जीवनात, वर्तनात, भाषेत आणि व्यक्तिमत्त्वात अमुलाग्र बदल झाला. मला ज्या पुस्तकांनी सर्वात जास्त प्रभावित केले व हृदयात कायमचे स्थान मिळवले ती पुस्तके खूप आहेत. त्यातील काहींचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. बुद्ध आणि त्यांचा धम्म, गोदान, गबन, महाभोज, फकिरा, ययाती, दौलत, झाडाझडती, पानिपत, रमाई, श्यामची आई, एक होता कार्व्हर, गारंबीचा बापू, तोत्तोचान, बलुतं, तराळ अंतराळ, उचल्या, उपरा, कोल्ह्याट्याचं पोर, अक्करमाशी, परत्या, रंग माणसांचे, परिघ, श्रीमान योगी, आमचा बाप आणि आम्ही, मृत्युंजय, व्यक्ती आणि वल्ली, बटाट्याची चाळ,वारणेचा वाघ, सोनचाफा,ज्ञान योग,कर्मयोग,छावा,वैजयंता,भारतीय संस्कृती,सांगावा, पायवाट तुडवताना,पार्टनर हे ग्रंथ,पुस्तके,कादंबऱ्या,कथासंग्रह, आत्मचरित्रे माझ्या मनाला खूप भावले.मी ही पुस्तके पुन्हा पुन्हा वाचली आहेत.या पुस्तकांनी मला वाचनाचा खराखुरा आनंद दिला आहे. ऊशिराने का होईना विद्यार्थीदशेत मला वाचनाची गोडी लागली. वाचनाच्या वेडामुळे मनाची तृप्ती होईपर्यंत मी पुस्तकांचे वाचन केले.त्यामुळे जीवनाला कलाटणी मिळाली.

# जिसका मुझे था इंतजार, जिसके लिए दिल था बेकरार

आधुनिक केसरी

**अमिताभ बच्चन यांची `अंग्री यंग मन'ची प्रतिमा यशस्वीपणे निर्माण केली ती `जंजीर' या चित्रपटाने ! तो उत्तम चालल्यावर तशा भूमिकांचे पेवच फुटले. जो तो निर्माता अमिताभना घेऊन आपला चित्रपट यशस्वी करण्याच्या मागे लागला. खास त्यांच्यासाठी भूमिका लिहिल्या जाऊ लागल्या. निर्माते नरिमन इराणी यांनी १९७८ साली अमिताभना घेऊन `डॉन' हा चित्रपट निर्माण करण्याचे ठरविले. नायिका होत्या झीनत अमान. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी त्यांनी दिग्दर्शनक्षेत्रात प्रथमच पदार्पण करणारे चंद्र बारोट यांच्यावर सोपविली. या पहिल्याच चित्रपटाने बारोट यांना स्टार दिग्दर्शक बनविले. या चित्रपटात प्राण, इफ्तेखार, ओम शिवपुरी, पिंचू कपूर, सत्येन कप्पू, हेलन, जगदीश राज, कमल कपूर, पी. जयराज, राजन हक्सर, अपर्णा चौधरी, केशव राणा, मॅक मोहन, मुद्दू शेट्टी, मास्टर अलंकार, माणिक इराणी आदी सहकलाकार होते.**



गीते अंजान (लालजी पांडेय) आणि इंदिवर (श्यामलाल बाबू राय) या दोन गीतकारांनी लिहिली होती आणि संगीत कल्याणजी-आनंदजी या बंधूंच्या जोडीने दिले होते.

या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे पोलिसांना सतत गुंगारा देत आपल्या गँगकरवी समाजविघातक कारस्थाने करणारा गुन्हेगार डॉन (अमिताभ बच्चन) त्याच्या गँगमधला रमेश जेव्हा गुन्हेगारी सोडण्याचे ठरवितो तेव्हा त्याला संपवितो.



परिणामी रमेशची बहीण रोमा (झीनत अमान) आणि प्रेयसी कामिनी (हेलन) डॉनच्या शत्रू बनतात. एका घटनेत कामिनी मारली जाते. डीएसपी डिसिल्वा डॉनला पकडण्यासाठी त्याचा पाठलाग करत असताना डॉन मारला जातो; पण डॉन मरण पावला आहे हे केवळ डिसिल्वा यांनाच ठाऊक असते. म्हणून त्या गँगपर्यंत पोहोचण्यासाठी ते डॉनसारखा दिसणाऱ्या विजयला (अमिताभ) गँगमधे डॉन म्हणून पाठवितात. विजय सांभाळ करत असलेल्या दोन लहान मुलांना योग्य शिक्षण देईन असे डिसिल्वानी विजयला वचन दिलेले असते. ही दोन मुले प्रत्यक्षात जसजीत ऊर्फ जे जे (प्राण) याची असतात. जसजीत शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर येतो. विजय खरा कोण आहे, हे लिहिलेले असलेली लाल डायरी डिसिल्वाकडे आहे, हे जसजीतला समजते. पण स्वतःला इंटरपोलचा अधिकारी म्हणविणारा मलिक (ओम शिवपुरी) डिसिल्वाची हत्या करतो. प्रत्यक्षात तो वर्धन नावाचा गुन्हेगार असतो. आता ती डायरी मिळविण्यासाठी सगळ्यांची धडपड सुरू होते. अखेर ती डायरी मिळते कोणाला ?या चित्रपटातील "जिसका मुझे था इंतजार" हे लता मंगेशकर आणि किशोर कुमार यांनी गायिलेले द्वंद्वगीत डॉन (अमिताभ बच्चन) आणि रोमा (झीनत अमान) यांच्यावर चित्रित झाले आहे. नायक-नायिका मनातील प्रेम व्यक्त करण्यासाठी गात आहेत असे वाटेलही; पण प्रत्यक्षात ते द्वंद्वाच्या स्वरूपातच असून रोमा आपल्या मनातला सूडाच्या भावनेने पेटलेला ज्वालामुखी शब्दांकरवी व्यक्त करते. माझ्यापासून तू वाचू शकणार नाहीस, असे ती त्याला बजावते. डॉनही काही कमी नसतो. तुझी जादू कोणावर चालली की नाही याचा प्रत्यय कधीतरी येईलच. कोणाला जगायचे आहे आणि कोण मरणार आहे, हे तुला कुठे ठाऊक आहे, असे तो तिला प्रत्युत्तर करतो. दोन्ही अर्थ निघतील अशा या गीतकार अंजान यांच्या गीताचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. कल्याणजी-आनंदजी यांनी गीताच्या चालीत मेंडोलिन, सॅक्सोफोन आदी वाद्यांचा वापर केला आहे. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :

**अनिल तोरणे**
**तळेगाव दाभाडे, पुणे**

**जिसका मुझे था इंतजार**
**जिसके लिए दिल था बेकरार**
**वो घडी आ गई आ गई**
**आज प्यार में हद से गुजर जाना है**
**मार देना है तुझको या मर जाना है**
**मुझपे क्या गुजरी तू क्या जाने**
**तू क्या समझे ओ दीवाने**
**ले के रहूँगी बदला तुझसे**
**आई हूँ दिल की आग बुझाने**
**कातिल मेरी नजरों से बच के कहाँ जाएगा**
**दिया है जो मुझको वही तू मुझसे पाएगा**
**वो घडी आ गई आ गई**
**तीर बन के जिगर में उतर जाना है**
**जादू तेरा किसपे चला**
**होगा किसी दिन ये फ़ैसला**
**वो घडी आएगी आएगी**
**जाना तूने अभी ये कहाँ जाना है**
**किसे जीना है और किसको मर जाना है**
**होगा तेरा आशिक जमाना**
**औरों का दिल होगा तेरा निशाना**
**नाज न कर यूँ तीर-ए-नजर पे**
**आए हमें भी तीर चलाना**
**जो है खिलाडी उन्हें खेल हम दिखाएँगे**
**अपने ही जाल में शिकारी फँस जाएँगे**
**वो घडी आएगी आएगी**
**वक्त आने पे तुझको ये समझाना है**

# वाचकांच्या मनात घर करणारी कादंबरी: स्वप्नाचिया देशी!

आधुनिक केसरी

स्वप्नाचिया देशी ही लेखकाची आठवी कादंबरी आहे. विविध साहित्य प्रकारातलं त्यांचं हे 41 वा पुस्तक. आजकालच्या तरुण मुलांच्या भाव विश्वास डोकावणारे हे पुस्तक. तरुण पिढी त्यांना त्यांच्या आवडणाऱ्या प्रदेशात शिक्षण ,नोकरी या निमित्त स्थायिक होतात, परंतु तिथे गेल्यावर ते आपल्या मातृभूमीला विसरलेले नसतात. आपल्या घरापासून आणि आपल्या कुटुंबापासून हजारो किलोमीटर दूर असलेल्या कोणाही व्यक्तीला आपल्या माय भूमीचे आणि आपल्या कुटुंबाची आठवण येणे साहजिक आहे. या कादंबरीतील नायक अमर हा सुद्धा आपला कुटुंबापासून आणि आपल्या भारत देशापासून परक्या अशा देशात नोकरी निमित्त आला आहे. ज्यावेळी नायकाला आपल्या घराची आठवण येते, कधी एकटेपणा वाटू लागतो, त्या प्रत्येक आनंदाच्या आणि दुःखाच्या प्रसंगी आपला लाडका खेळाडू सचिनची संवाद साधला जातो. तोही मनातल्या मनात. कादंबरीची सुरुवात अमरने अशाच अस्वस्थ मनस्थितीत सचिनशी केलेल्या संवादातून होते. सचिनशी अमरने साधलेला हा संवाद मुळातूनच वाखाण्यासारखा आहे. सचिन हा अमरसाठी मित्र आहे, गुरु आहे आणि देवही आहे. लहानपणापासून परदेशात जाण्याच्या स्वप्न पाहिलेल्या एका गरीब शेतकरी कुटुंबातील अमरला प्रचंड कष्ट आणि मेहनतीने नोकरी मिळून आपले स्वप्न पूर्ण केले. परंतु आयुष्यास स्वप्न पूर्ण करण्यासाठी कुणाला तरी आपल्या स्वप्नांचा, इच्छेचा त्याग करावा लागतो .असाच मोठा त्याग नायकाच्या मोठ्या बहिणीने आसावरीने केला आहे. तिचा त्याग पाहून वाचकांचे डोळे पानावल्याशिवाय राहत नाहीत .बारावी मध्ये मेरिटला आलेल्याने डॉक्टर होण्याच्या स्वप्न पाहणाऱ्या आसावरीला मात्र इच्छा असूनही पुढे शिक्षण घेता येत नाही. आपल्या शिक्षणापेक्षा आणि आपल्या लहान भावाच्या शिक्षणासाठी शाळेला कायमचा रामराम करून ती आई- वडिलांसोबत मजुरीची कामे करायला लागते हे पाहून आपल्यासारख्या वाचकाला गदगदून आल्याशिवाय राहत नाही. आपल्या समाजात आपल्या अवतीभवती, आपल्या शेजारी दिसतात आणि नेहमीच स्त्री व पुरुष समानता नसणाऱ्या या आपल्या समाजामध्ये स्त्रीवर अन्याय होताना दिसतो. मुलींना इच्छा असूनही चांगले शिक्षण पालक देऊ शकत नाही, त्यामागे पालकांची मानसिकता हा मोठा दोष आपल्याकडील समाज जीवनात आढळून येतो. बहिण भावा मधलं दाखवलेलं प्रेम आणि त्यामुळे आपल्याला आपल्यावर झालेला अन्याय म्हणून मनात कोणतीही तक्रार न ठेवता आसावरी सारख्या बहिणी भावाच्या सतत पाठीमागे राहतात आणि म्हणूनच अमरची ही तायडी वाचकांच्या मनात घर करून जाते. याचबरोबर त्याला प्रदेशात भेटलेले मित्र अखिलेश आणि सुबोध, भारतीय संस्कृतीचा ओलावा टिकवून ठेवण्यात त्यांचा हातभार आहे.दुरून डोंगर साजरे असे म्हणतात ते खरेच आहे. परदेश पाहायला छान आहे. परदेशात पगार भरमसाठ असला तरी महागाई आकाशाला भिडणारी आहे याची जाणीव परदेशात नोकरी करणाऱ्या पाल्यांना असते. परंतु आपल्यासारख्या आपल्याच देशात राहणाऱ्या लोकांना याची फारशी माहिती नसते. अमर प्रमाणेच कादंबरीमध्ये अखिलेश, सुबोध, मोनिका, उर्वशी, विलास, संजीवनी व आकांक्षा ही पात्रे येऊन प्रत्येकाची कहाणी लेखक आपल्याला वेगवेगळ्या कथांमधून सांगतात. त्याचबरोबर ते साजरे करत असलेले भारतीय सण आणि मायभूमीची आठवण यातून परदेशी वास्तव्य करणाऱ्या मुलांचे जग आपल्यासमोर मांडतात. कादंबरीत असावरी ही फक्त अमरची बहिण न राहता सर्व मित्रांची बहीण होते व कादंबरीच्या शेवटच्या भागात आसावरी व अभिलेष यांचे लग्न व त्या लग्नाला परदेशात स्थायिक झालेल्या सर्व त्यांच्या भावाच्या मित्रांची उपस्थिती सांगत ४२ भागातून ही कादंबरी फुलत जाते.




स्त्री पुरुष समानता, भारतीय समाज पद्धती, स्त्रियांना दुय्यम लेखन्याची पारंपारिक पद्धत, मुलांना दिले जाणारे महत्त्व, परदेशातील वास्तव्य व परदेशातील वास्तव, महागाई व देश यांचे समीकरण सांगणारे ही कादंबरी उत्कंठा वाढवीत कादंबरीच्या सुखांताकडे घेऊन जाते. एक समाजाभिमुख आणि वाचनीय कादंबरी!

**परिचय -योगिता हरीष मराठे**

**कादंबरी- स्वप्नाचिया देशी**
**लेखक- नागेश सू. शेवाळकर**
**प्रकाशक- दुर्वा एजन्सीज, पुणे**
**पृष्ठ क्रमांक-२१०**
**किंमत: ४५०/-**
**प्रथमावृत्ती विजयादशमी २०२३**

**नागेश शेवाळकर**
**पुणे**




# सोशल मीडिया टाळा

आधुनिक केसरी

सध्या मोबाईल फोन आणि इंटरनेटच्या प्रसारामुळे सोशल मीडिया वापराचेही प्रमाण बरेच वाढले आहे. तरुणच नव्हे, तर वयस्क लोकांनाही त्याचे व्यसन जडलेले दिसून येते. सतत मोबाईलवर फेसबुक, व्हॉट्सॲपवरील अपडेट्स तपासणे, रिल्स पाहत राहणे, यूट्यूबवरील व्हिडीओ शोधत बसणे, असा चाळाच आबालवृद्धांना लागला आहे. त्यात दिवसातील किती वेळ निघून जातो, ते कळतच नाही. त्याने महत्त्वाची कामे तर राहूनच जातात, शिवाय सोशल मीडियाचे व्यसन लागते. लोक वास्तवापासून दूर जाऊन आभासी आणि भ्रामक जगात वावरू लागतात.



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

जर्मनीतील ऱ्हूर विद्यापीठ आणि 'जर्मन सेंटर फॉर मेंटल हेल्द' यांनी या विषयावर नुकतेच संशोधन केले. ज्युलिया ब्रेलोवस्कैया यांनी या अभ्यासाचे नेतृत्व केले. त्यांनी प्रयोगासाठी १६६ जणांची निवड केली. हे सर्वजण नोकरी करणारे होते आणि दिवसातील किमान ३५ मिनिटे त्यांच्या कामाव्यतिरिक्त सोशल मीडियावर वेळ घालवत होते. संशोधकांनी त्यांची दोन गटांत विभागणी केली. एका गटाने त्यांच्या सवयींत काहीच बदल केला नाही. ते नेहमीप्रमाणे त्यांची नोकरी करून दिवसातील ठरावीक वेळ पूर्वीप्रमाणेच सोशल मीडियावर घालवत राहिले, तर दुसऱ्या गटातील सदस्यांनी नोकरी करत राहून दररोजचा सोशल मीडियावरील वेळ किमान ३० मिनिटांनी कमी केला. हे वेळापत्रक किमान एक आठवडा पाळले. त्यानंतर त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य तपासण्यात आले.

आजच्या आधुनिक जगात वावरत असताना भ्रमणध्वनीमुळे अर्थात मोबाईलने जग जरी जवळ आले असले तरी त्याचे दुरुपयोग वाढतांना अनेक वेळा समोर आले आहे आज प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे त्यामुळे काहीना काही कारणाने अनेकजण मोबाईलमध्ये सतत व्यस्त असतात एक वेळ जेवण नको मात्र मोबाईल पाहिजे अशी प्रत्येकांची अवस्था होवून बसली आहे त्यामुळे अनेकांना काही आजारांना तोंड द्यावे लागत आहे तर काहीजण अस्वस्थ झाले आहेत या सर्व प्रकारावर जर्मनमधील संशोधकांनी केलेल्या अभ्यासातून एक निष्कर्ष पुढे आला आहे दररोज आपण सोशल मीडिया वापरण्यात जेवढा वेळ खर्च करतो तो किमान ३० मिनिटे कमी केला तर आपले मानसिक आरोग्य सुधारते आणि कामातील एकाग्रता वाढते तसे बिहेवियर अँड इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी या वैज्ञानिक नियतकालिकात प्रसिद्ध झाले असल्याचे वृत्त आहे सद्या मोबाईल फोन आणि इंटरनेटच्या प्रसारामुळे सोशल मीडिया वापराचेही प्रमाण बरेच वाढले आहे तरुणच नव्हे तर वयस्क व्यक्तींनाही त्याचे व्यसन जडले आहे सतत मोबाईलवर फेसबुक, व्हाट्सॲप वरील अपडेट तपासणे, रिल्स पहात राहणे, युट्यूबवरील व्हिडिओ शोधत बसणे, असा चाळाच आबालवृद्धांना लागला आहे यामधून वेळ तर निघून जातोचं मात्र महत्त्वाची कामे राहतात तसेच सोशल मीडियावर नसताना घडामोडी आपल्याला कळणार नाहीत या भितीपोटी काहीजण सतत सोशल मीडियाचा वापर करतात त्यातून माणूस कायम अस्वस्थ, अस्थिर आणि सैरभैर राहतो नुकताच याविषयी जर्मनीतील ऱ्हुर विद्यापीठ आणि जर्मन सेंटर फॉर मेंटल हेल्थ यांनी संशोधन करुन सोशल मीडिया टाळा, मन : शांती मिळवा असा महत्वाचा निष्कर्ष काढला आहे तो निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल ! बहुतांश सोशल मीडिया वापरकर्ते त्यांच्या ऑनलाईन वेळ घालवण्यासाठी एक कारण देतात, ते म्हणजे 'फोमो'. 'फोमो' हे 'फिअर ऑफ मिसिंग आऊट' या इंग्रजी शब्दप्रयोगाचे लघुरूप आहे. आपण जर सतत सोशल मीडियावरील अपडेट्स तपासत राहिलो नाही तर आपण आपल्या मित्रमंडळींच्या मागे पडू, आपण सोशल मीडियावर नसताना घडलेल्या घडामोडी आपल्याला कळणार नाहीत, अशी भीती वाटत राहते. त्या भीतीपोटी हे लोक सतत सोशल मीडिया वापरत राहतात. त्याला 'फोमो' असे संबोधण्यात येते. त्यातून माणूस कायम अस्वस्थ, अस्थिर आणि सैरभैर राहतो. दररोज काही काळ सोशल मीडियाचा वापर कमी केल्यास 'फोमो' घटण्यासही मदत होते, असे या अभ्यासातून दिसून आले आहे.

# २४ लाख ४४ हजारांचा सुगंधित गुटखा पकडला

आधुनिक केसरी न्यूज



**इगतपुरी :** मुंबई-नाशिक मार्गांवरून राज्यात बंदी व साठा, वितरण करण्यास बंदी असलेला २४ लाख ४४ हजार रुपयांचा सुगंधीत तंबाखू पानमसाला गुटखा घोटी टोलवर रात्री दहा वाजता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला. यामध्ये तिघांवर कारवाई करण्यात आली असून यातील दोन संशयित इसम अटक करण्यात आले आहे. मुंबई-नाशिक मार्गांवरून मोठ्याप्रमाणात सुगंधित पांनमसाला गुटखा जाणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक दिलीप खेडकर यांना मिळाली होती. त्यामुळे पोलीस अधीक्षक शाहजी उमाप यांनी तातडीने कारवाईच्या सूचना पथकास दिल्या. त्या आधारावर दुपारपासूनच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जागोजागी तळ ठोकून उभे होते. घोटी टोलवर मुंबईच्या दिशेने जाणारा मालवाहतूक आयशअर वाहन ( क्रमांक : एमएच ४, ईवाय-९७६८ ) चॉकलेटी रंगाची बॉडीपेंक वाहन हे रात्री दहा वाजता जात आसल्याचे दिसून येतचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चालकास वाहन बाजूला घेण्यासाठी सांगितले. त्यावर चालकाने 'क्या साब,कुछभी तो नही. क्यू परेशान करते हो' म्हणत वाहन न थांबवता पळून जाण्याच्या इराद्याने वाहन जोराने पुढे नेण्याचा प्रयत्न केला. मात्र अगोदरच सापळा लावून बसलेल्या पथकातील इतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तातडीने वाहन आडवे लावून त्याला पोलिसी खाक्या दाखवला. दरम्यान एक संशयित आरोपी अंधाराचा फायदा घेत फरार झाला. तर दोघांना अटक करण्यात यश आले.

यामध्ये सुनील भवरलाल गुप्ता ( वय ३२ ) रा.सॉहा महाढा ता. फत्तेपूर उत्तर प्रदेश,सोहेलखान शकील खान ( वय २३ ) रेहमा अपार्मेंट बाबुपुरा कानपुर. यांना अटक तर मोहमद परवेजखान पूर्ण नाव माहित नाही हा फरार झाला. वाहनाची तपासणी केली असता आतमध्ये प्लास्टिक गोण्यामध्ये १४ लाख ३४ हजार तीनशे रुपयांचा गुटखा व दहा लाख रुपये किंमतीचे वाहन असा एकूण किंमत २४ लाख,४४ हजार तीनशे रुपयांचा मुद्देमाल पकडण्यात आला.

चौकट : पोलीस प्रशासनाची दिशाभूल करण्यासाठी पकडण्यात आलेल्या मालावरील किंमती ह्या ५०पैसे, दोन रुपये आशा छापून मालाची किंमत कमी करण्याच्या उद्देशाने छापण्यात आल्याचं पोलिसांचे मत आहे. बाजार किंमत लक्षात पाहता अंदाजे मालाची किंमत ही एक ते सव्वा कोटीच्या आसपास असण्याचा अंदाज आहे.

या पथकात सहायक पोलीस निरीक्षक दिलीप खेडकर, हवालदार योगेश पाटील, शांताराम घुगे,प्रशांत पाटील सहभागी होते.



# सामाजिक बांधिलकी जपत रामनाथ पंडित यांनी केले रुग्णांना फळवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील वेश्वी दादरपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेसचे रायगड जिल्हा सरचिटणीस रामनाथ पंडित हे नेहमी सामाजिक बांधिलकी जपत गोरगरिबांना मदत करीत असतात. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप केले.तसेच उरण मधील विविध गावातील निराधार लोकांना अन्न धान्याचे वाटप केले. तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाउ वाटप देखील केले. त्यांच्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पुरुषोत्तम जाधव यांच्या प्रयत्नातून ग्रामीण भागांसाठी दोन कोटींचा निधी उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव यांच्या



पाठपुराव्यामुळे ग्रामविकास व पंचायतराज विभागातर्फे ग्रामीण भागात गावांतर्गत सुविधा पुरविण्यासाठी 'दोन कोटी रुपये' निधी मंजूर झाला आहे. यामध्ये वित्तीय वर्षात सातारा जिल्ह्यातील एकूण ५० गावातील विकासकामांना निधी उपलब्ध होण्याबाबत प्रस्ताव प्रशासनाला देण्यात आला होता. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे हे सातारा जिल्ह्याची भूमिपुत्र असल्याने जिल्ह्यातील प्रत्येक कामाप्रती ते नेहमी तत्पर असतात, त्यामुळे जिल्ह्यातही नागरिकांचा शिवसेनेवरील विश्वास वाढत चालला आहे असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव यांच्याद्वारे करण्यात आले. जिल्ह्यातील ५० गावांना प्रत्येकी ४ लाख रुपये याप्रमाणे सुमारे दोन कोटी रुपये मंजूर झाले असुन लवकरच कामांना शुभारंभ होणार असल्याचे यावेळी पुरुषोत्तम जाधव यांच्या वतीने सांगण्यात आले. यामध्ये खंडाळा तालुक्यातील बावकलवाडी जि.प.शाळा संरक्षित भिंत बांधणे, पिसाळवाडी पद्मावती मंदिर रस्ता काँक्रिटीकरण करणे, शेखमिरवाडी समाजमंदिर तयार करणे, हरतळी मंदिर परिसर सुशोभीकरण करणे, वडवाडी जि.प.शाळा सुशोभीकरण करणे, केसुर्डी जानुबाई मंदिर सुशोभीकरण करणे, खेड बु. प्रवासी निवारा शेड बांधणे, धावडवाडी भैरवनाथ मंदिर ते मज्जिद रस्ता काँक्रिटीकरण करणे, अतिट मंदिर सुशोभीकरण करणे, पळशी मेन चौक सुशोभीकरण करणे तसेच शिवाजीनगर तसेच अंदोरी, कराडवाडी, भाटघर, कर्णवडी, विंग, पाडळी, लिंबाचीवाडी, कान्हवडी, कवठे, बावडा, अहिरे, म्हावशी, लोणी, तोंडल, वाघोशी, अजनुज, अंबरवाडी, हरिपुर (वाण्याचीवाडी) , पवारवाडी, कन्हेरी, पारगाव, बोरी व वडगाव पोटणीस या गावांच्या स्मशानभूमी सुशोभीकरणासाठी निधी मंजूर झाला आहे. वाई तालुक्यातील मांढरदेव प्रवासी निवारा शेड बांधणे, वेळे सोळाशी फाटा येथे प्रवासी निवारा शेड बांधणे तसेच यशवंतनगर, लोहारे, मांढरदेवी, चाळकेवाडी,मुंगसेवाडी, वरची-बेलमाची, बालेघर, परखंदी या गावांमध्ये स्मशानभूमी सुशोभीकरण करणे.महाबळेश्वर तालुक्यातील मेटगुताड, मेटतळे, भिलार व अवकाळी या ठिकाणी प्रवासी निवारा शेड बांधणे, गारळेवाडी ता. खटाव येथे स्मशानभूमी सुशोभीकरण करणे, एकीव ता.जावळी येथे जि.प.शाळा सुशोभीकरण करणे या कामांचा समावेश आहे.

# सावंगी गोळेगाव शेलगाव वगळता तालुक्यात पुलांच्या कठड्यांना रंगरंगोटीसाठी सूट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात ठिकठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वर्ष २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात ठिकठिकाणी रस्ते खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण पुल कामे करण्यात आली या कामात अनेक त्रुट्या आहे या संदर्भात वेळोवेळी विभागाला अवगत करुनही विभाग व वरिष्ठ चालढकल करत वेळ मारुन नेत आहे तर सावंगी गोळेगाव शेलगाव पुलकामाची रंगरंगोटी वगळता तालुकाभर ठेकेदारांना पुलकठाडे रंगरंगोटी व पुल दरम्यान मुरुम टाकून सपाटीकरण कामाला सुट देण्यात आल्याचे चित्र आहे.ही सुट ठेकेदारांना का ?असा प्रश्न नागरिक करत आहे.खुलताबाद तालुक्यात वर्ष २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात बाजार सावंगी येथे तीनपुल काम, शेलगाव गिरीजा नदी एक पुलकाम, सावंगी ते बोडखा मुख्य रस्ता तीन ते चार पुल काम, झरी गाव ते बोडखा रस्ता दोन पुल कामे, सावंगी- जैतखेडा रस्ता झरी फाटा वडगाव कन्नड -खुलताबाद हद्दीत चार ते पाच पुल काम,बोडखा धामणगाव धामणगाव तांडा टाकळी राजेराय काटशेवरी फाटा दरम्यान चार पाच पुल कामे , कनकशीळ रस्ता एक पुल काम करण्यात आले आहे. यात बाजार सावंगी,शेलगाव,गोळे गाव येथील पुल कामांवर कठाड्याना रंगरंगोटी करण्यात आली आहे.व पुलादरम्यान रस्ता सपाटीकरण करण्यात आला आहे.या व्यतिरिक्त काही पुल काम दरम्यान सपाटीकरण करण्यात आले आहे.मात्र काही ठिकाणी पुल कठाड्याला रंगरंगोटी व सपाटीकरण कामे करुन घेण्यात आले नाही.अनेक त्रुट्या कामात असल्याचे वेळोवेळी विभाग व वरिष्ठांना कळविण्यात आले आहे तरी ठेकेदारांना विभाग सुट का म्हणून देत आहे. शासन व जनतेचा पैसा निधी असताना व कामांच्या अंदाज पत्रकात कठडा रंगरंगोटी रस्ता सपाटीकरण चा समावेश असताना विभाग व वरिष्ठ याकडे का म्हणून दुर्लक्ष करत आहे.व ठेकेदाराला सुट देत आहे. असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहे.या सर्व बाबीची सखोल चौकशी करून सर्व कामे करुन घेवूनच बील अदा करावे असी मागणी नागरिकांतून होत आहे.



# विकसित भारत संकल्प यात्रेला मोठी गर्दी; प्रकल्पांची माहिती देणारे फलक

आधुनिक केसरी न्यूज

खेमजाई (चंद्रपूर): गावोगावाला विकासाच्या संकल्पासाठी केंद्र सरकारच्या 'विकसित भारत संकल्प यात्रा' कार्यक्रमाचा आज येथे जोरदार प्रारंभ झाला. यावेळी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी आणि अन्य मान्यवरांनी मोठ्या उत्साहात उपस्थित जनतेला संबोधित केले. या कार्यक्रमासाठी गावात भव्य मंच उभारण्यात आला होता. हजारोंच्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला वाद्यवादनाच्या गजरावजाबरोबर 'विकसित भारत संकल्प यात्रा' या फलकांचे उद्घाटन करण्यात आले. या फलकांवर भारत सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली होती. शेतकरी, युवा, महिला आदींना लाभ देणाऱ्या योजनांचे सविस्तर चित्रण या फलकांवर करण्यात आले होते.

या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. या भाषणात मोदींनी देशाच्या प्रगतीसाठी, ग्रामीण विकासासाठी, गरिबी निर्मूलनासाठी सरकार करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. सर्व गरीब कुटुंबांना घरे मिळावे यासाठी सरकार राबवत असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच गावोगावाला स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज अशा मूलभूत सुविधा पोहोचवण्यासाठी सरकारने केलेल्या कामाची माहितीही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमात अनेक लाभार्थींना प्रतीकात्मक स्वरूपात लाभ देण्यात आले. शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप, यशस्वी महिला उद्योजकांचा सत्कार आणि इतर लाभार्थींना योजनांचे प्रमाणपत्र असे कार्यक्रम पार पडले. विकसित भारत संकल्प यात्रा कार्यक्रमाच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या योजनांची माहिती ग्रामीण भागात पोहोचवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. या यात्रेदरम्यान मंत्री, खासदार आणि इतर मान्यवर ग्रामीण भागात जाऊन लोकांशी संवाद साधणार आहेत. या यात्रेमुळे ग्रामीण भागात विकासाचा नवचैतन्य निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.



# मतदारसंघात शिवसेनेचाच भगवा पुन्हा फडकणार : साळुंखे

## येणाऱ्या सर्व निवडणुका ताकदीने लढू : मोहन अग्रवाल

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** परभणी लोकसभा मतदारसंघ शिवसेनेचाच आणि शिवसेनाच पुन्हा भगवा फडकणार असून मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकांमध्येही शिवसेनेचेच उमेदवार निवडून येतील असे परतुर येथील शिवदुत, बूथ प्रमुख, व शिवसेना पदाधिकारी मेळाव्या प्रसंगी परभणी लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना पक्ष निरीक्षक सुभाष साळुंखे बोलत होते.

परतुर येथे परतुर /मंठा विधानसभा शिवसेनेच्या वतीने मेळावा आयोजित करण्यात आला असता अध्यक्ष म्हणून परभणी लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना पक्ष निरीक्षक सुभाष साळुंखे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर ,शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल, महिला आघाडी प्रमुख कालींदाताई ढगे युवासेना जिल्हा प्रमुख अजय कदम हे होते. पूढे बोलताना साळुंखे म्हणाले की, परभणी लोकसभा मतदारसंघ गेल्या कित्येक वर्षापासून शिवसेनेचाच बालेकिल्ला आहे या ठिकाणी शिवसेनेचेच उमेदवार निवडून आलेले आहेत आणि आताही शिवसेनेचाच उमेदवार या परभणी मतदार संघाला दिला जाणार आहे यामध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपरिषदेचेही निवडणुकीसाठी उमेदवार दिले जातील महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री



एकनाथराव शिंदे यांना जिल्हाप्रमुख अग्रवाल यांनी केलेल्या कार्याचा आढावा सकारात्मक दिला जाईल. यांच्या कामाची पावतीही यांना मिळेल.तर अग्रवाल यांच्या मनोगतात म्हणाले की माझ्या कार्यक्षेत्रातील येणाऱ्या सर्व निवडणुका आम्ही ताकदीने लढू व जास्तीत जास्त उमेदवार निवडून येतील यावर जास्त फोकस करू अग्रवाल यांनी त्यांच्या कामाचा लेखाजोखा साळुंखे यांच्यासमोर मांडला त्यामध्ये विधानसभेची परिस्थिती नगरपालिकेची परिस्थिती व शिवसैनिकांना न्याय कसा देता येईल यावर भर दिला जाईल. परतुर तालुक्यासह शहरातील विविध भागासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून विशेष प्रयत्न करून विकास कामाकरिता भरपूर निधी आणून कामे आहे चालू आहेत तसेच तालुक्यातील पांदण रस्ते 95 5 CC रस्ते व गट्टू ची कामे मोठ्या प्रमाणात शिंदे साहेबांनी फंड दिल्यामुळे चालू आहेत शहरात विविध भागात सिमेंट रस्ते सिमेंट नाल्या मोठ्या प्रमाणात स्वरूपाचे कामे चालू आहेत असेही अग्रवाल म्हणाले. शिवसैनिक निराश होणार नाही शिवसैनिक बेरोजगार राहणार नाही याची सुद्धा दखल घेतल्या जाईल यानंतर परतूर शहरांमध्ये बेरोजगार मिळावे ग्रामीण भागातील राहिलेल्या सर्व शाखा गाव तिथे शाखा व घर तिथे शिवसैनिक याप्रमाणे काम केल्या जाईल .या मेळाव्यामध्ये विविध पदाधिकारी यांच्याकडून पक्ष वाढीचा आढावा ,पदाधिकारी कडून घेण्यात आला यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल महिला जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे शिवाजी तरवटे यांनी मनोगत व्यक्त केली कार्यक्रमाचे प्रस्ताविक परतुर विधानसभा संघटक विजयकुमार गिरी यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले ,परतुर तालुका प्रमुख अमोल सुरूंग, मंठा तालुकाप्रमुख उदयसिंग बोराडे, तालुका संघटक विजयकुमार गिरी, वैद्यकीय मदत कक्षाचे विधानसभा प्रमुख शिवाजी तरवटे, शहर प्रमुख दीपक हिवाळे ,उपतालुकाप्रमुख नितीन राठोड, सोपान कातारे ,विभाग प्रमुख गजानन आकात ,सरपंच दिनकर शेंडगे ,युवासेना तालुका प्रमुख अविनाश कापसे, दलित आघाडी संघटक राहुल भदर्गे अल्पसंख्याक तालुकाप्रमुख शेख खाजा, नसीर खान पठाण यांनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर प्रमुख दीपक हिवाळे यांनी केले तर आभार शिवसेना वैद्यकीय कक्षाचे शिवाजी तरवटे यांनी मानले, या मेळाव्यास परतूर मंठा तालुक्यातील बुथ प्रमुख, शिवदूत व शिवसैनिक पदाधिकारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यामध्ये जिल्हा प्रमुखा मोहन अग्रवाल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून परतूर येथील शाहेद सय्यद व इतर वीस तरुणांनी प्रवेश घेतला तसेच या ठिकाणी विविध पदाधिकाऱ्यांना सुद्धा नियुक्ती पत्राचे वाटपही करण्यात आले.

# अखेर.. माकडांची टोळी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे वडोद खुर्द येथे माकडांच्या टोळीने ग्रामस्थ शालेय विद्यार्थी महिला मुले यांना सळो की पळो करून सोडले होते व मोठी धुमाकूळ लावल्याने गावकऱ्यांनी वनविभागा कडे तक्रार करून बंदोबस्त करण्याची मागणी केली होती त्यावरुन वनविभागाने छ.संभाजीनगर येथुन पथक बोलवून शुक्रवारी माकडांना जेरबंद केले. वडोद खुर्द येथे ३०-४० माकडांच्या टोळीने गावकऱ्यांना सळो की पळो करून सोडले होते.जिल्हापरिषद शाळे जवळ घनदाट झाडी असल्याने याचा सहारा घेत व लगतच शाळा असल्याने शालेय विद्यार्थ्यांचा वावर आहे परंतु शाळेत विद्यार्थी आला की त्यांच्या मागे धावणे, दप्तर हिसकावत माकड चाळे करणे, धक्का देणे, दात ईचकत दहशत निर्माण करणे, जेवणडबा हिसकावणे, तर गावात भाकरी पळवणे धावणे उड्या मारणे या सर्व प्रकाराला नागरिक त्रास्त झाले होते ऐवढेच नव्हे तर शालेय विद्यार्थींची शाळा, शाळेऐवजी मंदिरात भरावी लागली विद्यार्थी शिक्षक विशेषतः महिला मुले मुली माकडामुळे भयभीत झाले होते. यासंदर्भात ग्रामस्थांनी वनविभागाला तक्रार करून माकडांची बंदोबस्त करावे असी मागणी केली होती त्यावरुन वनविभाग छ.संभाजीनगर येथून पथक बोलवून माकडांचा पिंजऱ्यात पकडून संयुक्त कारवाई करण्यात आली. वनविभागाचे हनुमंत धुमाळ, एस व्ही मंकावर, आशा चव्हाण यांनी या बाबत सुचना केल्यावरुन वनपरिक्षेत्र अधिकारी एआर पेहरकर, एम एम उधार,एस आर मोरे, एआर ठाकुर, केपी शिंदे वनविभाग कर्मचारी वनमजुर यांनी घटनास्थळी पिंजरा लावुन माकडांचा बंदीस्त करुन टेम्पोद्वारे पकडून नेले व गावकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.





# आदिवासी संघटनेचे संस्थापक ढवळे यांचा धुळे दौरा; शासकीय विश्रामगृह येथे बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** या ठिकाणी शिवाजीराव ढवळे यांनी सरकारवर निशाणा साधून आरक्षणाबाबत टीका करण्यात आली व हिवाळी अधिवेशनात त्या संदर्भात पत्रकारांशी संवाद साधला.

एकलव्य संघटना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव ढवळे यांनी महाराष्ट्रात आदिवासी निधी खर्चाबाबत आदिवासी बजेट कायदा तयार करावा या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्रभर एकलव्य संघटनेच्या वतीने अभियान राबविण्यात येत आहे आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय येथे किमान 50 टक्के आदिवासी कर्मचारी अधिकारी असावेत तसेच योजना वाटप बाबत TSP व OTSP असा भेदभाव होता कामा नये सर्व आदिवासींना निधीचा समान वाटप करण्यात यावे. आदिवासी मध्ये होत असलेले धनगर समाजाची घुसखोरी रोखण्यासाठी राज्यभर आंदोलने उभारण्यात येणार आहे असे या ठिकाणी सांगितले. तसेच नागपूर अधिवेशनात सर्व आदिवासी आमदारांची 19 डिसेंबर रोजी बैठक आयोजित करण्यात येणार असून धनगर आरक्षण विषयावर चर्चासत्र अधिवेशनात घेण्याबाबत चर्चेत शिवाजीराव ढवळे यांना आमंत्रित करण्यात आलेले असून ते नागपूर अधिवेशनाच्या ठिकाणी जाऊन सर्व आदिवासी आमदारांची भेट घेणार आहेत असे या ठिकाणी सांगण्यात आले.

# उरणमधील पहिल्या मानाच्या पालखीचे शिर्डीकडे प्रस्थान

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील श्री साई बाबांची मानाची पहिली पालखी श्री साई सेवा मंडळ( रजि.) उरण तालुका व देणगीदार, जनतेच्या वतीने काढण्यात आली असून गेली २२ वर्षे ही पदयात्रा निरंतर, श्रद्धामय, धार्मिक वातावरणाने शिस्तमय पद्धतीने आजही चालूच आहे. यंदा पदयात्रेचे हे २३ वे वर्ष आहे. यंदा श्री साई सेवा मंडळ उरण तालुका, देणगीदार, जनता यांच्या वतीने भव्य पालखी, वारकरी दिंडी पदयात्रा श्री दत्त मंदिर, देऊळवाडी( उरण शहर )येथून रविवार दि १७/१२/२०२३ रोजी सकाळी ७ वाजता श्री ची आरती करून श्री क्षेत्र शिर्डीकडे प्रस्थान झाली आहे.पहाटे ५ वा. पूजन व भजन, पहाटे ५:१५ वा.ॐ श्री साईनाथाय नमः या मंत्राचा जप व पुढे मार्गस्थ, दुपारी १२ वा. माध्यान्ह आरती,१२:३० श्री साई सच्चरित्राचे सामूहिक पारायण व साईस्तवन मंजरी वाचन, ३:३० पुढील मुक्कामाकडे प्रस्थान, सायंकाळी ६:१५ धुपारती, रात्री ८:३० महाप्रसाद असे दैनंदिन कार्यक्रम आहे. तब्बल २६१ किलामीटरचा पायी प्रवास( पदयात्रा ) करून पालखी दत्त जयंतीच्या एक दिवस अगोदर म्हणजेच सोमवार दि २५/१२/२०२३ रोजी सकाळी



१० वा. श्री क्षेत्र पुण्यधाम शिर्डी येथे पोहोचनार आहे. पालखी दिंडीच्या सांगता प्रित्यर्थ श्री साई भंडारा व श्री सत्य नारायणाची महापूजा शनिवार दि ०६ जानेवारी २०२४ रोजी श्री रत्नेश्वरी मंदिर, जसखार, उरण येथे संपन्न होणार आहे. रविवार दि १७/१२/२०२३ रोजी सकाळी ७ वा श्री ची पालखी व पादुका साई भक्तांच्या दर्शनासाठी श्री दत्त मंदिर देऊळवाडी येथे ठेवण्यात आले होते. साई भक्तांनी या श्री च्या पालखी व पादुकांच्या दर्शनाचा लाभ घेतला.श्री साई सेवा मंडळ उरण तालुका, देणगीदार, जनतेच्या वतीने पालखी उरण वरून शिर्डी कडे प्रस्थान झाली आहे.

# तरूणाचे हात कापणाऱ्या हल्लेखोरांचा शोध सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** मुरबाड तालुक्यातील देवपे गावातील तरूणाला दोन दिवसापूर्वी बारवी धरण परिसरात अडवून त्याचे दोन्ही हात सहा हल्लेखोरांनी कापून टाकले आहेत. त्याच्या सर्वांगावर धारदार शस्त्राने वार करून हल्लेखोर पळून गेले आहेत. या सर्व हल्लेखोरांचा मुरबाड पोलिसांची विशेष तपास पथके शोध घेत आहेत.

या प्रकरणात श्रीकांत धुमाळ आणि त्यांच्या सहा साथीदारांचा सहभाग असल्याचा जबाब गंभीर जखमी झालेल्या सुशील भोईर याने पोलिसांना दिला आहे. पोलीस ठाण्यातील गुन्ह्यात तशी नोंद केली आहे. हल्ल्यानंतर सुशील काही वेळ रस्त्यावर पडून होता. त्यामुळे सुरूवातीला त्याची हत्या झाल्याची माहिती सर्वदूर पसरली होती. हल्लेखोरांनी सुशीलचे दोन्ही हात धारदार तलवारीने कापून टाकले आहेत. सुशीलवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत. तो उपचारांना प्रतिसाद देत असल्याचे डॉक्टरांनी त्यांच्या समर्थकांना सांगितले आहे.हा हल्ला पूर्ववैमनस्यातून झाला असल्याची माहिती पुढे येत असली तरी या हल्ल्याच्या मुळाशी राजकीय कारणे असल्याची चर्चा मुरबाड तालुक्यात आहे. पोलीस या सर्व प्रकरणांचा विविध अंगांनी तपास करत आहेत.

# गावस्तरावरील कर्मचाऱ्यांची हजेरी आता क्यूआर कोडद्वारे

## मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल : नांदेड जिल्ह्यात 7 हजार 853 क्यूआर कोड

आधुनिक केसरी न्यूज

**नंदकुमार कांबळे**

**नांदेड :** जिल्हा परिषद अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या हजेरीसाठी आता क्यूआर कोड बसवण्यात आल्याची असल्याची माहिती नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी ही माहिती दिली आहे. यासाठी गाव स्तरावर 7 हजार 853 क्यूआर कोड लावण्यात आले आहेत. त्यामुळे आता वरिष्ठांना हजेरीची ऑनलाईन माहिती मिळणार आहे. ग्रामीण भागात तसेच दुर्गम भागात कर्मचारी



गावात वेळेत उपस्थित राहत नाहीत. काही वेळा अनुपस्थित राहतात अशा तक्रारी वारंवार जिल्हा परिषदेला येत होत्या. त्या अनुषंगाने ग्राम पातळीवरील कर्मचारी गावात वेळेत उपस्थित राहून आपले कर्तव्य बजवावे यासाठी गाव स्तरावर कर्मचारी उपस्थितीसाठी क्यूआर कोड बसविण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी घेतला आहे. ग्रामीण भागात शिक्षक, ग्रामसेवक, आरोग्य पर्यवेक्षीका, अंगणवाडी पर्यवेक्षीका, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील कर्मचारी, पशुसंवर्धन विभागाचे कर्मचारी यांच्या उपस्थिती क्यूआर कोडव्दारे घेण्यात येत आहे. कार्यालयातील उपस्थिती पटानंतर सर्व कार्यालयात बायोमेट्रिक बसवण्यात आले होते. आता मात्र ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांसाठी क्यूकोड बसवण्यात आले आहेत. हे कर्मचारी क्यूआर कोडद्वारे उपस्थिती नोंदवत आहेत. गावा-गावात क्युआर कोड लावण्याचे काम पूर्ण झाले आहे. यामध्ये ग्रामपंचायत स्तरावर 1 हजार 310 क्यूआर कोड, शाळा स्तरावर- 2 हजार 194, प्राथमिक आरोग्य केंद्र- 70, आरोग्य उपकेंद्र- 379, अंगणवाडी केंद्र- 2 हजार 963, मिनी अंगणवाडी- 759, पशु वैद्यकीय श्रेणी-1 दवाखाने- 74 तर पशु वैद्यकीय श्रेणी-2 च्या 104 दवाखाने असे एकूण 7 हजार 853 क्यूआर कोड लावण्यात आले आहेत. यामुळे आता ग्रामीण भागात कर्मचाऱ्यांची उपस्थिती राहून ग्राम विकासाची कामे मार्गी लागतील, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी व्यक्त केला आहे.



# अहीर यांची रेल्वे मंत्र्यांसोबतची भेट फलदायी

## चंद्रपूर - यवतमाळ जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण रेल्वे समस्यांवर सखोल चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील रेल्वे समस्या व रेल्वेशी संबंधीत अन्य विषयांवर राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दि. 13 डिसेंबरला केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेवून जिल्ह्यातील रेल्वे प्रवाश्यांना रेल्वे सोयी व सुविधांबाबत होत असलेला त्रास व गैरसोयीबाबत सविस्तर चर्चा केली.

या चर्चेप्रसंगी रेल्वेचे झेडआरयूसीसी सदस्य दामोदर मंत्री, डीआरयूसीसी सदस्य पुनम तिवारी, गौतम यादव प्रभूती उपस्थित होते. या भेटीमध्ये हंसराज अहीर यांनी काजीपेठ पुणे ट्रेन नं. 22151/52 प्रतिदीन सुरू करण्यात यावी, बल्लारशाह वरून मुंबईकरीता दररोज ट्रेन सुरू करावी. नंदीग्राम एक्सप्रेस स्ट्रे नं. 11401/402 ही गाडी आदीलाबादहून व्हाया नांदेड मुंबईला जाते ती आदीलाबाद वरून बल्लारशाहपर्यंत विस्तारीत करण्यात यावी. दक्षिण एक्सप्रेस ट्रेन नं. 12721/22 निजामुद्दीन येथून हैद्राबाद पर्यंत चालविण्यात येत आहे ही गाडी हैद्राबादला 19 तास उभी असते त्यामुळे या गाडीचे सोलापूरपर्यंत विस्तारीकरण केल्यास नागपूर वर्धा, चंद्रपूर, वर्धा, बल्लारशाह, कागजनगर, मंचेरीयल, रामगुंडम, काजीपेठ जाणाऱ्या रेल्वे



प्रवाश्यांना चांगली सुविधा होईल असेही अहीर यांनी रेल्वे मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. बल्लारपूर पिटलाईनचे काम पुर्ण झाल्याने चंद्रपूर व विदर्भातील रेल्वे प्रवास्यांना रेल्वेच्या मुबलक सोयी सुविधा उपलब्ध करण्यास रेल्वे प्रशासनास मोठा वाव असल्याचे हंसराज अहीर यांनी चर्चेदरम्यान मंत्र्यांच्या निदर्शनास आणुन दिले.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात 4 लाखांहून अधिक बंगाली बांधव वास्तव्यास आहेत. त्यांच्या राज्यात किंवा स्वगृही येणेजाणे करण्यास चंद्रपूर ते हावडा ही थेट गाड नसल्याने या दोन्ही जिल्ह्यातील बांगाली बांधवांना नागपूर किंवा गोंदीया येथून ट्रेन पकडावी लागते त्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो आहे. त्यामुळे बंगाली बांधवांकरीता चेन्नई-बिलासपूर ट्रेन नं. 22620 हावडापर्यंत विस्तारीत करण्यात यावी. किंबहूना नांदेड सांतरागाच्छी ट्रेन नं. 12767/68 चंद्रपूर वरून चालविण्यात यावी. किंवा ट्रेन नं. 11447/48 जबलपूर-हावडा ही ट्रेन बल्लारशाह पर्यंत विस्तारीत करून सदर ट्रेनचा धांबा चांदाफोर्ट स्टेशनवर देवून या समाजाला न्याय द्यावा असेही अहीर यांनी रेल्वेमंत्र्यांशी चर्चेवेळी सांगीतले. या भेटीत चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील रेल्वेविषयक अनेक महत्वपुर्ण बाबींवर सविस्तर चर्चा झाली. केंद्रीय रेल्वे मंत्र्यांसोबतची सदर भेट अत्यंत फलदायी झाली असून रेल्वेमंत्र्यांनी येत्या महिनाभरात या सर्व बाबींवर सकारात्मक निर्णय घेऊ असे अहीर यांना आश्वासीत केले. यावेळी श्री. मौर्या रेल्वे बोर्ड सदस्य तथा कार्यकारी निदेशक कोचिन हे सुध्दा उपस्थित होते. त्यांनीही या न्याय मागण्या संदर्भात सकारात्मक भूमिका मांडत या सर्व मागण्यांच्या पुर्ततेकरीता लक्ष घालण्याचे आश्वासन दिले.

# १५ दिवसांपासून अंगणवाडीला कुलूप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील अंगणवाडी कार्यकर्ती (सेविका) व मदतनीस गत ४डिसेंबरपासून विविध मागण्यांसाठी बेमुदत संपावर असुण १५दिवस झाली यावर कुठलाही तोडगा न निघाल्याने अंगणवाड्या कुलूप बंद असुण गरोदर माता, स्तनंदा माता, किशोरी मुली, कुपोषण मुलांची देखरेख,नोंदी बालकांची लसीकरण व पोषण आहार वाटपचा पुरता बोजवारा उडाला असुण सर्व सेवा ठप्प असल्याचे चित्र खुलताबाद तालुक्यात आहे.व हे कुठ पर्यंत लांबणीवर पडणार याची शाशवत नसल्याने नागरिकांमधून चिड निर्माण झाली आहे.

तालुक्यात मोठी अंगणवाडी १०८ कार्यकर्ती १०१, मिनी अंगणवाडी ६५ कार्यकर्ती ६४ पैकी ३१ दरम्यान कार्यकर्ती सेविका मदतनीस बेमुदत संपात सहभागी झाले नाही. अंगणवाडी मोठी व मिनी यांच्याकडे गरोदर माता स्तनंदा माता किशोरी मुली बालकांचे लसीकरण कुपोषित बालके मुले प्रकृती देखरेख नोंदी शून्य ते सहा वयोगटातील मुले प्रकृती सुधार सेवा वजन उंची ज्ञानर्जन सेवा आदि यांची संदर्भिय आरोग्य सेवा व पोषण आहार वाटपची सेवा अंगणवाडीतून देण्यात येतात. परंतु शासनाकडून तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागते यात अखंडीत काम व मावेजा पेक्षा अधिक सेवा काम द्यावी लागते. यामुळे आम्ही वेळोवेळी निवेदने देऊन आम्हाला शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, ग्रॅच्युइटी,पेंशन, टीए बील, इंधन बिल, सीबीइचे पैसे, गणवेश सिम कार्ड चे रिचार्ज तातडीने द्यावे व कार्यकर्ती सेविका यास २६हजार रुपये तर मदतनीस यास २०हजार रुपये दरमहा मानधन देण्याची सततची मागणी केली आहे. परंतु याकडे शासन दुर्लक्ष करून आहे.



# धुळे जिल्ह्यात उपासक बंधु-भगिनींनी उत्साहात दिली पाली भाषा परीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बुद्ध विहार समन्वय समिती नागपूर द्वारा, धुळे जिल्हा बुद्ध विहार समन्वय समितीमार्फत रविवार, दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी जिल्ह्यातील विविध ३० केंद्रांवर ९५० विद्यार्थ्यांची पाली भाषा परीक्षेचे आयोजन सकाळी ११ ते १२ दरम्यान करण्यात आले होते. सदर परीक्षांमध्ये धुळे तालुक्यात १०, धुळे शहर ५, शिरपूर तालुक्यात ६, साक्री तालुक्यात ४, सटाणा तालुक्यात १, शहादा तालुक्यात २, शिंदखेडा तालुक्यात ३ केंद्रे, या केंद्रांवर परीक्षा ही समन्वयक आणि परीक्षक यांच्या नियंत्रणात आयोजित करण्यात आली होती. या परीक्षा आतापर्यंत पाच स्तरापर्यंत घेण्यात आल्या आहेत. या पालीभाषा परीक्षांना वय व शिक्षणाची अट नाही. बुद्धिस्ट तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसार तसेच पाली भाषा अवगत होणे हा उद्देश या परीक्षा घेण्यामागे आहे. संपूर्ण भारतात हया परीक्षा डिसेंबर महिन्यात एकाच दिवशी व एकाच वेळेस घेण्यात येतात. परीक्षांना सर्व स्तरावर बौद्ध व बौद्धेतर उपासक बंधु भगिनी सहभागी होत असतात. परीक्षांच्या सुरुवातीस बुद्ध वंदना घेण्यात येत असते. परीक्षेचा कालावधी एक तासाचा असतो. यावर्षीच्या पाली भाषा परीक्षेला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला. परीक्षेसाठी धुळे जिल्हा बुद्ध विहार समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. विलास चव्हाण, समन्वय समितीचे पदाधिकारी डॉ. सुरेश बिऱ्हाडे, इंजी. जी. बी. पवार, राजेंद्र थोरात, बी. बी. साळवे, सुभाष निकुंबे, व्ही. टी. गवळे, डॉ. महेंद्रकुमार वाढे, प्रकाश रणदिवे, प्रभाकर पवार, किशोर शेजवळ, डॉ. संजय ढोडरे, डॉ. नगराळे, डॉ. घोडसे, अनंत भामरे, प्रा. खुशाल कांबळे, नानासाहेब मोरे, आयु. विद्याताई तायडे, डॉ. ललित संदानशीव, वाघोदे, पानपाटील, भीमराव कढरे, नितीन गायकवाड, दिपक लोंढे, विनोद सोनवणे, रत्नमाला सोनवणे, आण्णा आगळे, ॲड. राहुल वाघ, पानिराज बैसाणे, सुरेंद्र मोरे, भैय्यासाहेब गवळे, कैलास सोनवणे, ललिता शिरसाठ, भारती शिंदे, शिवाजी बैसाणे, डॉ. शरद भामरे, प्रा. ईश्वर खैरनार, लोटन वाघ, नानासाहेब देवरे, बी. यु. वाघ, विनोद चव्हाण, आनंद सैंदाणे, सिद्धार्थ जाधव, आदींनी परिश्रम घेतले.

# कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी केंद्रीय मंत्री नाईक यांच्यासोबत सकारात्मक चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ ही कामगारांच्या कल्याणासाठी रात्रंदिवस कार्यरत असून ही संघटना भारतातील सर्वात मोठी संघटना असलेल्या भारतीय मजदूर संघाशी संलग्न माहे. संघटनेच्या माध्यमातून कामगारांचे अनेक प्रश्न मार्गी लागले असून काही प्रश्न प्रलंबित आहेत. त्या अनुषंगाने प्रलंबित प्रश्न, समस्या सोडविण्यात याव्यात यासाठी भारतीय पोर्ट आणि डॉक महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश पाटील तसेच राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांची नुकतीच दिल्लीत भेट घेतली. व त्यांच्या सोबत कामगारांच्या समस्यावर चर्चा केली. यावर कामगारांच्या समस्या लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन मंत्री श्रीपाद नाईक यांनी कामगार नेते सुरेश पाटील, कामगार नेते सुधीर घरत यांना दिले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# दुष्काळी परिस्थितीबाबत सरकार उदासीन, विरोधी पक्ष अस्तित्वहीन!

## सत्ताधारी व विरोधकांची मिलीभगत : ॲड. प्रकाश आंबेडकर यांची पत्रकार परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** सध्या नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. विदर्भातील विविध संघटनांनी अनेक प्रश्नाबाबत आवाज उठवला होता. त्यामध्ये प्रामुख्याने विदर्भातील ओला दुष्काळ व कोरडा दुष्काळ या संदर्भात शेतकऱ्यांच्या समस्यांचा विशेष मुद्दा होता. परंतु सत्ताधाऱ्यांनी या सर्व प्रश्नांना बगल देत, केवळ कर्मचाऱ्यांच्या जुनी पेन्शनबाबत थातूरमातूर चर्चा केली. या सर्व घडामोडीवर विरोधी पक्ष पाहिजे तेवढा आक्रमक होताना दिसला नाही. एकंदरीत परिस्थिती पाहता दुष्काळी परिस्थिती बाबत राज्य सरकार उदासीन तर विरोधी पक्ष असं अस्तित्वहीन असल्याचे मत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषद मध्ये व्यक्त केले आहे.सोबतच सत्ताधारी व विरोधीकांची मिलीभगत असल्याचा आरोप देखील केला आहे.

पुढे बोलताना, एड. प्रकाश आंबेडकर यांनी वाढती महागाई, शेतकऱ्यांच्या शेतमालाचा भाव, वेगळा विदर्भ, पिकविमा, दुष्काळी परिस्थिती आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा आदी मुद्द्यांना हात घालत, याबाबत राज्य सरकारकडे कुठलेही विशेष ध्येयधोरण नसल्याचे नमूद केले आहे. तर काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडीतील इतर घटक पक्ष सरकारला कुठल्याही ठोस मुद्द्यावर कोंडीत पकडण्यात सपशेल अपयशी ठरले असून, राज्यातील विरोधी पक्षच अस्तित्वहीन असल्याची प्रखर टीका देखील त्यांनी केली आहे. विरोधकांच्या एकंदरीत हालचालीवरून सत्ताधारी व विरोधक यांची मिलीभगत असल्याचा आरोप देखील त्यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. आगामी लोकसभा निवडणुका लक्षात घेता अनेक महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावून घेण्याची हीच योग्य वेळ असून, त्याबाबत संबंधित संघटनांनी आक्रमकपणे आपल्या मागण्यांचा पाठपुरावा करावा असे आवाहन देखील यावेळी त्यांनी केले आहे.

कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करून घ्यायची असेल, तर दगडाखालचा हात काढून घ्यायची हीच योग्य संधी असल्याचे सूचक विधान देखील त्यांनी पार पडलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केले आहे. शेतकऱ्यांच्या समस्या बाबत बोलताना ते म्हणाले, पीक विम्याची अग्रमी रक्कम मंजूर केल्याची घोषणा केली. मात्र काही शेतकऱ्यांच्या खात्यात सदर रक्कम अद्याप पर्यंत जमा झाली नाही. अनेक शेतकऱ्यांना अजून पर्यंत पिक विमा ची रक्कम मिळालीच नाही हे वास्तव आहे. अवकाळी पावसाने शेतीचे मोठे नुकसान झाले दुष्काळ जाहीर करून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी पोटतिडकेने करत आहेत. परंतु याबाबत राज्य सरकार उदासीन असून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडत आहे. तर विरोधी पक्ष फक्त बघ्याची भूमिका घेत आहे. यावरून सत्ताधारी व विरोधी यांची मिली भगत असल्याचे जाणवते. अशी टीका यावेळी वंचीत बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा एड. आंबेडकर यांनी केली. यावेळी त्यांच्या सोबत महीला राष्ट्रीय अध्यक्ष अंजलीताई आंबेडकर, अरूंधती सिरसाट, किरणताई गिऱ्हे, ज्योतीताई इंगळे, सोनाजी इंगळे, अनिल गरकळ, सय्यद अकील भाई आदींची उपस्थिती होती.




**विदर्भातील लोक पाठिंबा देत नाहीत :** मध्यंतरी वेगळा विदर्भाचा मुद्दा खूप गाजला होता. वेगळा विदर्भ व्हावा या मागणीसाठी विदर्भातील काही नेत्यांनी एक चळवळ उभी केली होती. त्यात ऍड. आंबेडकर यांचा देखील सहभाग होता. परंतु सध्यास्थितीत हा मुद्दा थंडबस्त्यात पडला आहे..? असा प्रश्न उपस्थित केला असता, विदर्भातील लोकच वेगळ्या विदर्भसंदर्भात मदत करत नसल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# जिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन २०० खाटांमध्ये होणार

## आ. फारुख शाहांची धुळेकर नागरिकांना नववर्षाची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जुने जिल्हा रूग्णालयाचे श्रेणीवर्धन २०० खाटांमध्ये करणे, औषधीसाठा पुरविणे, साफसफाई कर्मचारी वाढविणे,सर्जरी विभाग सुरू करणे यासह रुग्णालयाचे अद्यावतीकरण करणे संदर्भात आ.फारुख शाह यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना.तानाजी सावंत यांचेकडे मागणी केली होती.त्यानुसार ना.तानाजी सावंत यांनी आज त्यांच्या दालनात विशेष बैठक बोलाविली होती. याबैठकित जुने जिल्हा रूग्णालयाचे श्रेणीवर्धन २०० खाटांमध्ये करण्याचा आदेश देण्यात आला. धुळे शहरातून हिरे वैद्यकीय महाविद्यालय चक्करबर्डी येथे गेल्यामुळे धुळेकर नागरिकांचे प्रचंड हाल होतात. रुग्णालय सुविधेसाठी शहरापासून ८ ते १० किमी.जाण्यासाठी नागरिकांना तोषिस पडते. पर्यायाने खिशाला न परवडणारे उपचार खाजगी दवाखाण्यात करावे लागतात.त्यासाठी शहराच्या मध्यवर्ती असणारे जुने जिल्हा रुग्णालयाचे अधिक अद्यावत होणे गरजेचे आहे. ही गरज लक्षात घेवून आ.फारुख शाह यांनी विशेष प्रयत्न चालविले आहे. त्याचाच एकभाग म्हणून आ.फारुख शाह यांच्या मागणीवरून ना.तानाजी सावंत यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत जुने जिल्हा रूग्णालयाचे श्रेणीवर्धन २०० खाटांमध्ये करणे, औषधीसाठा पुरविणे, साफसफाई कर्मचारी वाढविणे, सर्जरी विभाग सुरू करणे यासह रुग्णालयाचे अद्यावतीकरण करणे, पुरेसे कर्मचारी नियुक्त करणे यासंदर्भात चर्चा करण्यात येवून जानेवारी महिन्यात जुने जिल्हा रूग्णालयाचे श्रेणीवर्धन २०० खाटांमध्ये करण्याबाबत ना.सावंतांनी आदेश दिलेत. तसेच जुने जिल्हा रूग्णालयात तातडीने आवश्यक तो औषध पुरवठा करण्यात यावा, रुग्णालयाची स्वच्छ्ता राखण्यासाठी स्वच्छता कर्मचारी आणि इतर आवश्यक कर्मचारी नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले.सार्व.आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या दालनात झालेल्या बैठकीस आयुक्त धीरजकुमार, सहसंचालक डॉ.विजय कंधेवार,उपसंचालक डॉ.कपिल आहेर,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दत्ता देगावकर,आदी उपस्थित होते. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य मंत्रालय मार्फत धुळेकर नागरिकांना जुने जिल्हा रूग्णालयाचे श्रेणीवर्धन २०० खाटांमध्ये करण्याची भेट नववर्षात मिळणार असल्याने आ.फारुख शाह यांनी ना.तानाजी सावंत याचे धुळेकर जनतेच्यावतीने आभार मानले आहे.



# वर्ध्याची स्ट्रॉबेरी मुख्यमंत्र्यांना भावली

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** समुद्रपुर तालुक्यातील पाथरी येथील पाटील कुटुंब पूर्णतः शेतीत रमणारे. नव्या पिढीनेही हा वारसा आता चालविला आहे. घरात आलेली सून स्वतः शेतीत वेळ देणारी आणि म्हणून तिलाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट घालून देण्यात आली. त्यावेळी स्ट्रॉबेरीची चव मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतली. "मी पण माझ्या सातारा येथील शेतीत स्ट्रॉबेरीचे उत्पादन घेतो. पण त्यापेक्षा ही फळे अधिक चवदार व आकर्षक रंगाची आहेत", अशी पावती मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे भारती महेश पाटील यांनी सांगितले. पती महेश पाटील यांच्यासह त्यांची ही भेट जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी घालून दिली होती. गावात गेल्या दोन वर्षांपासून पाटील कुटुंब स्ट्रॉबेरी पिकवत आहे. उष्ण कटिबंधात असलेल्या शेतीत हे थंड हवामानातील पीक घेण्यावेळी अनेकांनी त्यांना असे धाडस न करण्याचा सल्ला दिला होता. पण आज ते तर उत्पादन घेतातच पण अन्य शेतकऱ्यांनाही त्यांनी प्रोत्साहन दिले आहे. एकूण अकरा एकर परिसरात लागवड होत आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या सोबतच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आमच्या स्ट्रॉबेरीची चव चाखली, असे त्या नमूद करतात. पाच एकरात किमान ६० ते ७० लाख रुपयाचे उत्पन्न होणार असल्याचे पाटील सांगतात.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर